https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -३५१ शनिवार दि.२९ ऑगस्ट २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-351 Saturday, Dt.29 August 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4




# ३२० भारतीय अद्याप बेपत्ता

## ४०० भारतीय सुरक्षित, एकूण मृत व्यक्तींचा आकडा ५७७ वर



नवी दिल्ली : वृत्तसंस्था

नेपाळमध्ये आलेल्या भीषण महाप्रलयात आतापर्यंत तब्बल ५७७ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती नेपाळ सरकारने आज दिली. तसेच अद्याप एकूण १९०० पेक्षा जास्त लोक बेपत्ता असून, यामध्ये ३२० भारतीयांचा समावेश आहे. मदत व बचाव कार्याद्वारे सध्या शोध मोहीम वेगात सुरू आहे. मात्र, अद्याप त्यांच्याशी संपर्क झालेला नाही. दरम्यान चीनच्या बाजूने तिबेट प्रदेशात असलेल्या ४०० भारतीयांशी संपर्क झाला असून, ते सुरक्षित आहेत. परराष्ट्र मंत्रालयाच्या नियंत्रण कक्षाने ही माहिती दिली. त्यातच चीनमधून १५३ भारतीय नेपाळमध्ये पोहोचल्याचीही माहिती आहे.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी चीनच्या बाजूला आमचे ४०० भारतीय नागरिक आहेत. ते सुरक्षित आहेत. ते त्यांच्या कुटुंबीयांच्या संपर्कात आहेत. आमचा दूतावास त्यांच्यापैकी अनेकांच्या संपर्कात आहे. त्यांच्या अनेक कुटुंबीयांनी बीजिंगमधील आमच्या दूतावासाद्वारे चालवल्या जाणा-या हेल्पलाइन क्रमांकांवरून आमच्याशी संपर्क साधला, असे म्हटले. तसेच चीनमधील आमचा दूतावास स्थानिक अधिका-यांच्या संपर्कात आहे आणि तेथे अडकलेल्या या लोकांना कसे बाहेर काढायचे यावर ते काम करत आहेत, असेही ते म्हणाले.

पूरग्रस्त भागातून काल काठमांडूमध्ये आलेले भारतीय नागरिक आज दिल्लीत पोहोचले. यातील २१ भारतीय नागरिक तामिळनाडूचे आहेत. काल आमच्या राजदूतांनी काठमांडूमध्ये त्यांची भेट घेऊन त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. याशिवाय त्रिशुली वन जलविद्युत प्रकल्पात काम करणा-या ६३ भारतीय नागरिकांविषयीही माहिती दिली. त्यांनाही काल सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. तसेच चीनच्या बाजूला अडकलेले १५३ भारतीय नागरिक रस्तामार्गे सुरक्षितपणे नेपाळमध्ये पोहोचले आहेत. त्यांना वाचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ज्या भारतीय लोकांशी संपर्क होऊ शकलेला नाही किंवा जे बेपत्ता आहेत, त्यांची संख्या सध्या ३२० आहे, असेही जयस्वाल यांनी सांगितले.

भोटेकोशी नदीला आलेल्या महापुरात शहरे आणि गावे जलमय झाली असून अनेक घरे, वाहने, रस्ते आणि पूल वाहून गेले आहेत. रसुवा आणि नुवाकोटमधील अनेक गावे चिखल व ढिगा-याखाली गाडली गेली असून जलविद्युत प्रकल्पांचेही मोठे नुकसान झाले. रस्ते आणि पूल वाहून गेल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला असून दुर्गम भागातील लोकांपर्यंत पोहोचण्यात बचाव पथकांना मोठ्या अडचणी येत आहेत. घरे, बाजारपेठा, शेती आणि सरकारी इमारती चिखलाखाली दबल्या गेल्या आहेत. संपूर्ण वस्त्या नामशेष झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

नेपाळवर ही दुर्घटना घडल्याच्या दिवशीच आम्ही मदतकार्य सुरू केल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी दिली. पहिले विमान २६ ऑगस्ट रोजी संध्याकाळी रवाना झाले. त्यात तात्पुरती निवारागृहे, ब्लँकेट्स, स्वच्छता किट, सौर दिवे आणि औषधांसह १० टन मदत साहित्य होते. त्यानंतर दुसरे विमान २७ ऑगस्ट रोजी सकाळी रवाना झाले. या विशेष विमानातून तंबू, ब्लँकेट्स, स्वच्छता किट, सौर दिवे, वॉटर पंप, किचन सेट, जनरेटर सेट, औषधे आणि खाद्यपदार्थ आदी साहित्य पाठविले. त्यानंतर आजही एक विमान रवाना झाले.

# शहागड पीएमश्री जि.प. शाळेत शिक्षकांचाच तुटवडा!

## जवळपास १०० पाचवीच्या विद्यार्थ्यांना ४ महिन्यांपासून शिक्षक नाही ?




**२२ पैकी १० पदेच कार्यरत, प्रभारी मुख्याध्यापक पदावरही बेकायदेशीर नियुक्ती - ग्रामस्थ, पालकांमध्ये तीव्र संताप, आंदोलनाचा इशारा**

शहागड प्रतिनिधी

जालना तालुक्यातील पी.एम. श्री दर्जा असलेल्या शहागड जिल्हा परिषद शाळेचे प्रशासनाने पार वाटोळे केले आहे. शाळेत २२ पदे मंजूर असताना केवळ १० शिक्षक कार्यरत आहेत. त्यामुळे ५० टक्के पदे रिक्त ठेवून विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ सुरू आहे.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे गेल्या ४ महिन्यांपासून पाचवीच्या जवळपास १०० विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी एकही शिक्षक उपलब्ध नाही. १० वी सारख्या बोर्डाच्या वर्षालाही विषय शिक्षक नाहीत.

एका शिक्षकाची हजेरीच लागत नाही. तो महिन्यातून एकदाच शाळेत येतो. मुख्याध्यापकांनी जाब विचारला असता उलट धमक्या दिल्या जातात, असा आरोप आहे. तरीही त्याची पगार मात्र नियमित निघते.

नियम डावलून ज्युनिअर शिक्षकाकडे प्रभारी मुख्याध्यापक पदाचा पदभार दिल्याने सेवाज्येष्ठ शिक्षकांमध्येही असंतोष आहे.

या संपूर्ण मुजोरीला कंटाळून विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेला वारंवार निवेदने दिली. मात्र शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती संगीता भागवत यांनी विद्यार्थ्यांना उडवाउडवीची उत्तरे देऊन जिल्हा परिषदेतून हाकलून दिले.

ही मुजोरी अजूनही कायम ठेवल्यास आम्ही तीव्र आंदोलन करू असा इशारा ग्रामस्थ आणि पालकांनी दिला आहे. त्यामुळे जिल्हा परिषद प्रशासनात खळबळ उडाली आहे.

या प्रकरणी तातडीने रिक्त पदे भरून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.- विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ - शहागड.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

दै. समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
७ वा वर्धापन दिन विशेषांक-२०२६

प्रति,
मा.श्री./सौ./श्रीमती

स.न.वि.वि.
मागील ६ वर्षांपासून मराठवाडा स्तरावर प्रकाशित होणारे शासनमान्य यादीवरील 'दै.समर्थ राजयोग' चा ७ वा वर्धापन दिन **शनिवार दि.५ सप्टेंबर २०२५ रोजी** साजरा करण्यात येणार आहे. आजपर्यंत आपल्या पाठवळावर कणखर बाणा कायम ठेवून निर्भीडपणे लिखन करत वृत्तपत्र वाचकांच्या विश्वासाला पात्र ठरले आहे. या निमित्ताने आम्ही 'वर्धापन दिन विशेषांक २०२६' चा विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेषांकामध्ये आपल्या संस्थेची प्रतिष्ठाणची, व्यवसायाची अथवा वैयक्तिक जाहिरात देवून वृत्तपत्राला भक्कम आर्थिक साथ द्यावी ही नम्र विनंती.

आपला विश्वासू
वैभव विवेक स्वामी (संपादक)
मो.9822628521

वर्धापन दिन जाहिरात दरपत्रक

| क्र | विवरण | साईज | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | रंगीत | पूर्ण पान | ४०,०००/- |
| २. | रंगीत | अर्धे पान | २०,०००/- |
| ३. | रंगीत | पाव पान | १०,०००/- |
| ४. | रंगीत | शुभेच्छा | ५,०००/- |

दिनदर्शिका-२०२७ जाहिरात दरपत्रक

| क्र | विवरण | साईज | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | १२ पेज | पूर्ण पट्टी | ३०,०००/- |
| २. | ६ पेज | पुर्ण पट्टी | २०,०००/- |
| ३. | १२ पेज | उभी पट्टी | ३०,०००/- |
| ४. | शुभेच्छा | पॅनल | २,०००/- |

कृपया आपण आपली व्यक्तिगत/संस्थेची जाहिरात वर दिलेल्या चौकोणात ✓ अशी मान्यता देऊन जाहिरात द्यावी ही नम्र विनंती.

प्रति,
मा.संपादक/व्यवस्थापक साहेब, दै.समर्थ राजयोग, बीड
महोदय,
वर्धापन दिन विशेषांक २०२६ किंवा दिनदर्शिका २०२७ करीता माझी वैयक्तिक/संस्थेची जाहिरात रु................/- पर्यंत प्रसिद्ध करावी. सदरील जाहिरात पोटी ॲडव्हान्स रु............./- रोख/चेक/डी.डी./ ऑनलाईन जमा करत आहे.

जाहिरातदाराचे नाव :
गाव : तालुका : जिल्हा :
मो.नं. :

₹5000/- ची जाहिरात देऊन वार्षिक वर्गणीदार विनामुल्य व्हा...!

जाहिरात पाठविण्यासाठी संपर्क :-
दै.समर्थ राजयोग कार्यालय
सम्राट चौक, शाहुनगर, बीड
Email : vaibhav11swami@gmail.com

जाहिरातीचे ऑनलाईन पेमेंट पाठवण्यासाठी
गुगल पे/फोन पे नंबर
9822628521
बँक खाते :
दै.समर्थ राजयोग
बँक ऑफ महाराष्ट्र
A/c No. - 60392843322
IFC Code - MAHB0001689
MICR Code - 431014303

७ व्या वर्धापन दिनानिमित्त
दै. समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
गौरव समर्पणाचा ! सन्मान ज्ञानदानाचा !!
आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६
सहभागाकरीता नम्र आवाहन

प्रस्ताव पाठवण्याची अंतिम तारीख
गुरुवार, २० ऑगस्ट २०२६

शिक्षण क्षेत्रातील समर्पण, अमूल्य योगदान आणि विशेष शैक्षणिक कार्याचा गौरव करण्यासाठी 'दैनिक समर्थ राजयोग' च्या वर्धापन दिनानिमित्त राज्यभरातील गुणवंत व उपक्रमशील शिक्षकांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे.यावर्षी विशेष प्राधान्याने दिव्यांग शाळांमधील शिक्षक/कर्मचारी व दिव्यांग संस्थाचालक यांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेतली जाणार आहे. तसेच जिल्हा परिषद, नगरपरिषद व खाजगी शैक्षणिक संस्थांमधील आपल्या विशेष कर्तृत्वाने आदर्शाचा वस्तुपाठ घालणाऱ्या शिक्षकांनाही सन्मानित करण्यात येणार आहे. तरी आपण आपल्या विशेष व कौतुकास्पद कामाचा संक्षिप्त अहवाल (पुराव्यांसह/छायाचित्रांसह) पाठवावा ही विनंती.

वैभव जगदेवी विवेक स्वामी
- संपादक




पुरस्कारासाठी पात्र निकष व वर्गवारी

1. दिव्यांग शाळा व संस्था :
दिव्यांग शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी.
दिव्यांग बांधवांसाठी विशेष कार्य करणारे संस्थाचालक.
निकष:
दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पुनर्वसनासाठी, शिक्षणासाठी व आत्मविश्वासासाठी केलेले विशेष व कौतुकास्पद कार्य.

2. सामान्य शाळा वर्गवारी:
जिल्हा परिषद, नगरपरिषद आणि खाजगी प्राथमिक/माध्यमिक शाळांमधील शिक्षक.
निकष:
गुणवत्तापूर्ण शिक्षण, शैक्षणिक उपक्रमशीलता, सामाजिक सहभाग आणि उत्कृष्ट कार्यकाळ.

प्रस्तावासोबत जोडायची माहिती:
पूर्ण नाव, पत्ता आणि संपर्क क्रमांक, सध्या कार्यरत असलेली संस्था/शाळा व पद, शैक्षणिक कार्यकाळात केलेले कार्य.

आपले प्रस्ताव पाठवण्यासाठी: ईमेल: vaibhav11swami@gmail.com व्हॉट्सॲप / संपर्क: 9822628521
कार्यालयाचा पत्ता: दैनिक समर्थ राजयोग कार्यालय, सम्राट चौक, शाहुनगर कॉर्नर, बीड - ४३११२२

## संपादकीय....

# तर कोणाचे सरकार?

देशात आज लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या तर भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) पुन्हा एकदा सत्तेवर येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. इंडिया टुडे आणि सी-व्होटरच्या ताज्या 'मुड ऑफ द नेशन' जनमत चाचणीनुसार एनडीएला ३२६ जागा मिळण्याचा अंदाज वर्तवला गेला आहे. जानेवारी महिन्यातील सर्वेक्षणात एनडीएला ३५२ जागा मिळतील, असा अंदाज होता. त्या तुलनेने आता २६ जागांची घट झाली आहे मात्र २०२४ च्या तुलनेत मतदारांचा विश्वास कायम असल्याचे दिसून येत असून २०२९ च्या निवडणुकांआधी सत्ताधा-यांसमोर तरुणांच्या असंतोषाचे नवे आव्हान उभे राहिले आहे. दुस-या बाजूला, विरोधी 'इंडिया' आघाडीला या सर्वेक्षणात १८५ जागा मिळण्याची शक्यता आहे जी जानेवारीच्या अंदाजापेक्षा फारशी वेगळी नाही. पक्षनिहाय आकडेवारीचा विचार केल्यास भाजप आणि काँग्रेसच्या समीकरणांमध्ये लक्षणीय बदल दिसत आहेत. आज निवडणूक झाल्यास भाजपला २६१ जागा मिळण्याचा अंदाज आहे. ६ महिन्यांपूर्वी वर्तवण्यात आलेल्या २८७ जागांच्या तुलनेत ही मोठी घसरण आहे

त्यामुळे भाजप बहुमताच्या २७२ या जादुई आकड्यापेक्षा थोडा मागे राहताना दिसत असला तरी २०२४ च्या प्रत्यक्ष २४० जागांपेक्षा हा आकडा जास्त आहे. देशभरातील पेपरफुटी आणि शिक्षण व्यवस्थेतील गोंधळामुळे तरुण पिढीमध्ये असलेला संताप भाजपला भोवताना दिसत आहे. दिल्लीतील आंदोलनानंतर शिक्षणमंत्र्यांना द्यावा लागलेला राजीनामा हा याच नाराजीचा भाग मानला जात आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आक्रमकपणे उचलून धरलेल्या मुद्द्यांचा काँग्रेसला फायदा होताना दिसत आहे. पक्षाला १०६ जागा मिळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला असून जानेवारीतील ८० जागांच्या तुलनेत काँग्रेसने मोठी आघाडी घेतली आहे.

मतांच्या टक्केवारीत दोन्ही आघाड्यांमध्ये तुल्यबळ लढत दिसत आहे. एनडीएच्या मतांची टक्केवारी जानेवारीतील ४७ टक्क्यांवरून घसरून ४५.१ टक्क्यांवर आली आहे. २०२४ च्या प्रत्यक्ष निवडणुकीत एनडीएला ४४ टक्के मते मिळाली होती. विरोधी आघाडीला ३९.१ टक्के मते मिळण्याची शक्यता असून जानेवारीच्या ३९ टक्क्यांच्या तुलनेत यामध्ये किंचित वाढ झाली आहे. या सर्वेक्षणासाठी जुलै ते २५ ऑगस्टदरम्यान २५,१८४ लोकांचे मत जाणून घेण्यात आले तर गेल्या ६ महिन्यांतील ९१,७९५ मुलाखतींचा आधार घेण्यात आला आहे. अलिकडे उदयास आलेल्या कॉक्रोच जनता पक्षामुळे देशातील राजकारण कमालीचे ढवळून निघाले आहे. त्यांनी देशभरातील तरुणाईला एकत्र आणण्याचे मोठे काम केले आहे. त्यातून सरकारविरोधी वातावरण तयार होत असल्याचे प्रकर्षाने जाणवत आहे. वाढत्या बेरोजगारीच्या समस्येमुळे तरुणाई त्रस्त आहे. त्यांना भविष्यातील अंधार स्पष्टपणे दिसत आहे.

# वाळूमाफियांचा हैदोस महसूल यंत्रणा संतापली

## अंबड चे तहसीलदार सोमेश मोहिते यांच्यावर जीवघेणा हल्ला
## वाळूमाफियांना पोलिसांचा आशीर्वाद असल्याचा गंभीर आरोप

अंबड शेख फारुक :-

शासनाचा कायदा राबविणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांनाच जर वाळूमाफियांच्या दहशतीला सामोरे जावे लागत असेल तर सामान्य जनतेने कायद्यावर विश्वास ठेवायचा तरी कसा अंबडचे तहसीलदार सोमेश मोहिते यांच्यावर २६ ऑगस्ट रोजी झालेल्या कथित जीवघेण्या हल्ल्याने महसूल विभागाचा संयमाचा बांध फुटला असून आता बस्स झाले अशी संतप्त भूमिका अधिकारी-कर्मचाऱ्यांनी घेतली आहे.अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या महसूल अधिकाऱ्यांवर हल्ला झाल्याचा आरोप असून या घटनेच्या निषेधार्थ अंबड व घनसावंगी तालुक्यातील महसूल अधिकारी-कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे धाव घेतली आहे. हल्लेखोरांची तातडीने अटक कठोर कायदेशीर कारवाई आणि महसूल पथकांना सशस्त्र पोलीस संरक्षण मिळेपर्यंत कामबंद आंदोलन करण्याची भूमिका समन्वय समितीने घेतली आहे.

कायद्याची अंमलबजावणी करायची की जीव मुठीत धरून फिरायचे

महसूल अधिकारी आणि कर्मचारी हे शासनाच्या आदेशानुसार अवैध वाळू उत्खनन वाहतूक आणि गौण खनिजांच्या अनधिकृत व्यवहारांवर कारवाई करतात. मात्र कारवाई करताना दबाव धमक्या आणि अडथळ्यांना सामोरे जावे लागत असल्याचा दावा कर्मचाऱ्यांनी केला आहे.

आता तर थेट तहसीलदारांवरच जीवघेणा हल्ला झाल्याने उद्या हल्ला कोणावर होणार? हा प्रश्न महसूल कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झाला आहे.

शासनाचा आदेश पाळायचा कारवाई करायची आणि त्याच कारवाईची किंमत जीव धोक्यात घालून मोजायची हे किती दिवस चालणार? असा संतप्त सवाल अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

गोंदी पोलीस ठाणे जवळ मदतीसाठी मात्र तासभर प्रतीक्षा या संपूर्ण प्रकरणातील सर्वाधिक गंभीर आरोप म्हणजे हल्ल्याचे ठिकाण गोंदी पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. घटना घडल्यानंतर तहसीलदारांनी पोलीस प्रशासनाशी संपर्क साधला मात्र सुमारे एक तास मदत मिळाली नाही असा आरोप महसूल अधिकारी-कर्मचाऱ्यांनी केला आहे.यामुळे पोलीस यंत्रणेच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

निवेदनात पोलीस प्रशासन वाळूमाफियांना सहकार्य करीत असल्याचे दिसून येते असा गंभीर आरोप करण्यात आला आहे.तसेच अवैध वाळू प्रकरणी गुन्हे दाखल करण्यासाठी गोंदी पोलीस ठाण्यात जाणाऱ्या मंडळ अधिकारी व तलाठ्यांना अपमानास्पद वागणूक मिळते आणि अपेक्षित सहकार्य केले जात नसल्याचा दावाही करण्यात आला आहे.



हे आरोप अत्यंत गंभीर असून जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासन या आरोपांची काय दखल घेणार याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.बंदुका द्या वाहने द्या मगच वाळूमाफियांशी भिडू

महसूल पथकांना केवळ आदेश देऊन मैदानात पाठवून चालणार नाही. त्यांच्या सुरक्षेची ठोस व्यवस्था करावी अशी मागणी करण्यात आली आहे.अवैध वाळू आणि गौण खनिज कारवाईसाठी जाणाऱ्या प्रत्येक महसूल पथकासोबत सशस्त्र बंदूकधारी पोलीस कर्मचारी स्वतंत्र शासकीय वाहन आणि आवश्यक पोलीस संरक्षण तातडीने उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी आहे.

अंबड आणि घनसावंगी तालुक्यातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र सुरक्षा व्यवस्था करावी तसेच जिल्हा प्रशासनाने तातडीची बैठक घेऊन सुरक्षा उपाययोजनांचा कृती आराखडा निश्चित करावा अशीही मागणी करण्यात आली आहे.

आरोपी मोकाट राहिले तर महसूल यंत्रणा ठप्प!

समन्वय समितीने प्रशासनाला थेट इशारा दिला आहे. हल्लेखोरांना अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई होईपर्यंत अंबड आणि घनसावंगी तालुक्यातील महसूल अधिकारी-कर्मचारी कामबंद आंदोलन करणार आहेत.मागण्यांवर तातडीने कार्यवाही झाली नाही तर ३१ ऑगस्टपासून आंदोलनाची व्याप्ती महाराष्ट्रभर वाढविण्याचा इशारा देण्यात आला आहे. राज्यातील महसूल अधिकारी-कर्मचाऱ्यांना आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करून महसूल यंत्रणेचे कामकाज बंद करण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.त्यामुळे प्रशासनाने या इशाऱ्याकडे केवळ कर्मचारी आंदोलन म्हणून न पाहता महसूल यंत्रणेच्या सुरक्षेचा आणि कायदा-सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न म्हणून पाहण्याची वेळ आली आहे.

वाळूच्या काळ्या साम्राज्याला लगाम कधी?

अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीविरोधात कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांनाच जर हल्ल्यांना सामोरे जावे लागत असेल तर या काळ्या धंद्यामागे नेमकी कोणाची ताकद आहे हा प्रश्नही आता ऐरणीवर आला आहे.वाळू उपशावर कारवाई करणारा अधिकारी सुरक्षित नाही पोलिसांकडून वेळेवर मदत मिळत नाही आणि हल्लेखोरांवर तातडीची कारवाई होत नाही अशी भावना निर्माण झाली तर प्रशासनाचा धाक उरणार तरी कसा या प्रकरणात हल्लेखोरांवर कठोर कारवाई करून महसूल कर्मचाऱ्यांना सुरक्षा देण्याची मागणी आता केवळ अधिकारी-कर्मचाऱ्यांची राहिलेली नसून शासनाच्या कायद्याचा आणि प्रशासनाच्या अधिकाराचा प्रश्न बनला आहे.प्रशासन आता तरी जागे होणार का? तहसीलदारांवर हल्ला झाल्यानंतरही जर प्रशासनाने ठोस पावले उचलली नाहीत तर वाळूमाफियांचा धाक वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे हल्लेखोरांची तातडीने अटक पोलिसांच्या भूमिकेची चौकशी महसूल पथकांना सशस्त्र संरक्षण आणि अवैध वाळू वाहतुकीविरोधात कठोर मोहीम राबविण्याची मागणी जोर धरत आहे.अधिकाऱ्यांच्या जीवाची किंमत आहे की नाही? हा सवाल आता जिल्हा प्रशासनासमोर उभा ठाकला आहे.निवेदन देताना महेंद्र गिरगे,राजेंद्र शिंदे,एस.बी. नरुटे,दरेकर,व्ही.एम. कोमटवार,शामराव विभुते, धारे एस.बी.,सी.डी.कराड, ए.पी.शेळके,एम.बी.घुगे, काशीनाथ घोणशीकर,संदीप सपकाळ,मिसाळ यू.जे., व्ही.के.येवले यांच्यासह अंबड व घनसावंगी तालुक्यातील महसूल अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# तडीपार इसमाच्या मुसक्या आवळल्या, ३ गावठी पिस्टलसह ३ जिवंत काडतुसे जप्त

## सातारा स्थानिक गुन्हे शाखेचे धडक कारवाई, ३ लाख २९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

सातारा । सनी लोंढे

सातारा जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार केलेला इसम गावठी पिस्टल विक्रीसाठी घेऊन आल्याची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून त्याला जेरबंद केले. त्याच्याकडून ३ देशी बनावटीची पिस्टल, ३ जिवंत काडतुसे, मोबाईल हँडसेट आणि मोटारसायकल, असा एकूण ३ लाख २९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सातारा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडुकर यांनी विनापरवाना अग्निशस्त्र बाळगणाऱ्यांची माहिती काढून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याच्या सूचना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांना दिल्या होत्या.

त्यानुसार डउइचे पथक सातारा शहर परिसरात पेट्रोलिंग करत असताना निरीक्षक विश्वजीत घोडके यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, करंजे येथील महानुभव मठाजवळील रस्त्यावर फलटण परिसरातील एक इसम शाईन मोटारसायकल (चक-५३-८१९३) वरून गावठी पिस्टल विक्रीसाठी घेऊन येणार आहे.



माहितीच्या आधारे पथकाने महानुभव मठाजवळ सापळा रचला. रात्री सुमारे ८.१० वाजता संशयित इसम मोटारसायकलवरून तेथे आला. पोलिसांनी शिताफीने त्याला ताब्यात घेत झडती घेतली असता त्याच्याकडून मॅग्झीनसह ३ देशी बनावटीची पिस्टल आणि ३ जिवंत काडतुसे आढळून आली. त्याच्यासोबत मोबाईल हँडसेट व मोटारसायकलही जप्त करण्यात आली.

तपासात सदर इसमाला सातारा जिल्हा हद्दीतून दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आल्याचे निष्पन्न झाले.या प्रकरणी शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २७१/२०२६ अन्वये भारतीय हत्यार कायदा कलम ३(१), २५ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी

महेश गणपत इंगळे (वय २७), रा. आखरी रस्ता, मंगळवार पेठ, फलटण, ता. फलटण, जि. सातारा.या कारवाईत पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, सपोनि अभिजीत यादव, रोहित फार्णे, पोउनि परितोष दातिर, चंद्रकांत पुजारी, सफौ. राजू मुलाणी, अतीष घाडगे, पोहवा विजय कांबळे यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदारांनी सहभाग घेतला. जिल्हा वाहतूक नियंत्रण शाखेचे अमोल घाडगे यांनीही कारवाईत सहभाग घेतला.

सहभागी अधिकारी व अंमलदारांचे पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे आणि अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडुकर यांनी अभिनंदन केले.

# कुरिअरमधून नंबर मिळवून महिलेला अश्लील मेसेज; पाटोदा शहरात तीव्र

## संताप, कडकडीत 'बंद' पाळून निषेध!

दोषीवर तात्काळ कठोर कारवाईची मागणी; अन्यथा तीव्र आंदोलनाचा नागरिकांचा इशारा

पाटोदा (विशेष प्रतिनिधी):

पाटोदा शहरात महिलाच्या सुरक्षिततेला थेट आव्हान देणारी एक अत्यंत गंभीर आणि संतापजनक घटना समोर आली आहे. एका महिलेचा खाजगी मोबाईल क्रमांक कुरिअर सेवेच्या माध्यमातून मिळवून त्यावर मध्यरात्री अश्लील भाषेत मेसेज पाठवण्यात आल्याचा विकृत प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेने संपूर्ण शहरात प्रचंड खळबळ उडाली असून, महिला सुरक्षेच्या मुद्द्यावर शहरवासीयांचा संताप अनावर झाला. या विकृतीच्या विरोधात आणि प्रशासनाच्या निषेधार्थ आज पाटोदा शहरात कडकडीत 'बंद' पाळण्यात आला.

पार्सलमधून मिळवला वैयक्तिक संपर्क क्रमांक

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, दि. २७ ऑगस्ट रोजी रात्रीच्या सुमारास संबंधित महिलेच्या मोबाईलवर अज्ञात व्यक्तीकडून अश्लील व लज्जास्पद स्वरूपाचे मेसेज आले. प्राथमिक माहितीनुसार, सदर महिलेचा मोबाईल क्रमांक पार्सल अथवा कुरिअर डिलिव्हरीच्या नोंदीवरून हस्तगत करण्यात आला आणि त्याचा गैरवापर करून हा विकृत प्रकार करण्यात आला.

वैयक्तिक गोपनीयतेचा भंग आणि महिलांची सुरक्षा धोक्यात

कोणत्याही ग्राहकाचा मोबाईल क्रमांक ही त्याची अत्यंत खाजगी व गोपनीय माहिती असते. कुरिअर-पार्सल सेवा, ऑनलाईन डिलिव्हरी,



मोबाईल रिचार्ज किंवा रिपेअरिंगच्या निमित्ताने नागरिकांना आपले संपर्क क्रमांक द्यावे लागतात. मात्र, अशा सेवांचा आधार घेऊन जर महिलांचे नंबर मिळवून त्यांना अशा प्रकारे त्रास दिला जात असेल, तर ही बाब अत्यंत धोकादायक आणि चिंताजनक आहे. अशा कृत्यांमुळे महिला व मुलींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असून यावर तातडीने आळा घालणे गरजेचे असल्याची भावना व्यक्त होत आहे.

पोलीस ठाण्यात धडक; प्रशासनाला निवेदने

या घटनेच्या निषेधार्थ नागरिकांनी आणि विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींनी पाटोदा पोलीस ठाण्यात धडक देऊन निवेदन सादर केले. या प्रकरणात तांत्रिक तपास करून संबंधित विकृत विकृतीचा त्वरित शोध घ्यावा आणि त्याच्यावर कायद्यानुसार कठोर कलमांखाली गुन्हा दाखल करून कडक कारवाई करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती बीड जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक बीड, उपविभागीय अधिकारी (पाटोदा) आणि तहसीलदार पाटोदा यांनाही पाठवण्यात आल्या आहेत.

पाटोदा शहरात शुकशुकाट; 'कारवाई करा, अन्यथा रस्त्यावर उतरू'

घटनेच्या निषेधार्थ पाटोदा शहरातील व्यापारी व नागरिकांनी आपली प्रतिष्ठाने बंद ठेवून घटनेचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवला. महिला आणि मुलींच्या सुरक्षिततेशी छेडछाड करणाऱ्यांना कायद्याचा कठोर धाक बसलाच पाहिजे, अशी एकमुखी मागणी आंदोलकांनी केली. पोलिसांनी या प्रकरणात टाळाटाळ न करता तात्काळ मुख्य आरोपीला बेड्या ठोकाव्यात; जर कारवाईत दिरंगाई झाली किंवा आरोपीला

# जालन्यातील जनहिताच्या प्रकल्पांना निधी द्या

## घाणेवाडी तलावाच्या दुरुस्ती पासून हातवन प्रकल्पासाठी १५० कोटींपर्यंत मागणी

जालना शेख फारुक :-

जालना जिल्ह्याच्या विकासाच्या प्रश्नांवर केवळ आश्वासनांचा पाऊस नको आता निधी आणि प्रत्यक्ष कामाचा पाऊस पाडा शहराच्या पाणीपुरवठ्याचा कणा असलेल्या घाणेवाडी तलावाच्या सांडव्यांना भेगा पडल्या आहेत हातवन बृहत् लघु पाटबंधारे प्रकल्प निधीअभावी रखडला आहे औद्योगिक प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे रसायन तंत्रज्ञान संस्थेची कामे प्रलंबित आहेत आणि जिल्ह्यात वाढत्या गुन्हेगारीसमोर पोलिस यंत्रणेवर ताण आहे. या सगळ्या प्रश्नांचा बॅकलॉग घेऊन खासदार डॉ. कल्याण काळे यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आणि जालन्याला निधी द्या प्रलंबित प्रश्न सोडवा अशी जोरदार मागणी केली.

खासदार काळे यांनी मुख्यमंत्र्यांना विविध मागण्यांची स्वतंत्र निवेदने देत जालना शहर व जिल्ह्यातील जनहिताच्या प्रश्नांकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली.या भेटीनंतर पत्रकार परिषदेत त्यांनी विविध प्रश्नांचा पाढाच वाचला.

घाणेवाडी तलावाच्या भेगा सांगताहेत धोक्याची घंटा

जालना शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या घाणेवाडी तलावाच्या सांडव्यांच्या भिंतींना गंभीर स्वरूपाच्या भेगा पडल्याचा मुद्दा खासदार काळे यांनी उपस्थित केला.भविष्यात अतिवृष्टी झाली तर या भेगांमुळे धोका निर्माण होऊ शकतो.त्यामुळे सांडव्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबरोबरच तलावातील गाळ काढण्यासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी करण्यात आली.

तलावात मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्याने पाणी साठवण क्षमता कमी झाली आहे.एकीकडे शहराला पाण्याची चिंता आणि दुसरीकडे उपलब्ध जलसाठ्याची घटती क्षमता, अशी विसंगत परिस्थिती निर्माण झाली आहे.त्यामुळे घाणेवाडी तलावाच्या दुरुस्तीचा प्रश्न कागदावर न ठेवता प्रत्यक्ष कृतीत आणण्याची मागणी करण्यात आली.हातवन प्रकल्पासाठी १५० कोटी भूसंपादनाला गती द्या जालना तालुका व जिल्ह्यातील सिंचनासाठी महत्त्वाचा ठरणारा हातवन बृहत् लघु पाटबंधारे प्रकल्पही अनेक दिवसांपासून चर्चेत आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक भूसंपादनाची प्रक्रिया गतीने पूर्ण करून कामासाठी तब्बल १५० कोटी रुपयांचा निधी तातडीने उपलब्ध करून द्यावा अशी मागणी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे करण्यात आली.

प्रकल्प पूर्ण झाल्यास जालना शहरासह परिसरातील शेतीला सिंचनाचा मोठा आधार मिळू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या या प्रकल्पाला प्रशासकीय विलंबाच्या कचाट्यातून बाहेर काढण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

जालन्याच्या हवेत विकासाचा धूर की प्रदूषणाचा कहर

जालना एमआयडीसी परिसरातील



औद्योगिकीकरणाबरोबरच प्रदूषणाचा प्रश्न गंभीर होत असल्याचा मुद्दाही खासदार काळे यांनी मुख्यमंत्र्यांसमोर मांडला. परिसरातील गावांमध्ये धूर धुळीचे कण पाण्याच्या गुणवत्तेबाबतच्या तक्रारी तसेच श्वसनाशी संबंधित त्रासाच्या तक्रारी असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले.त्यामुळे स्वतंत्र आणि सखोल प्रदूषण तपासणी करावी औद्योगिक आस्थापनांचे विशेष ऑडिट करावे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उद्योगांवर कठोर कारवाई करावी आणि सांडपाण्याची नियमित तपासणी करावी अशी मागणी करण्यात आली.

उद्योग हवेत धूर सोडत असतील किंवा सांडपाण्यामुळे जलस्रोत धोक्यात येत असतील तर विकासाच्या नावाखाली नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड करता येणार नाही अशी भूमिका या मागणीतून स्पष्ट करण्यात आली आहे.

रसायन तंत्रज्ञान संस्था कागदावर नको निधी आणि मनुष्यबळ द्या

जालना येथील रसायन तंत्रज्ञान संस्थेच्या प्रलंबित बांधकामांना गती देण्याची मागणीही करण्यात आली. संस्थेच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय कामकाजासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे शिक्षकांना कायमस्वरूपी पदस्थापना देणे स्वतंत्र नोंदणी व आस्थापना व्यवस्था निर्माण करणे आणि पूर्णवेळ संचालकाची नियुक्ती करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.विद्यार्थ्यांना प्रयोगशाळा ग्रंथालय आणि अन्य शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक निधी देण्याची मागणीही करण्यात आली. संस्था उभी करायची असेल तर केवळ इमारती नव्हे तर त्यामागे सक्षम मनुष्यबळ आणि सुविधा उभ्या कराव्या लागतील हा मुद्दा खासदार काळे यांनी अधोरेखित केला.

# पोकळे वस्तीवरील जि.प. शाळा जीर्णावस्थेत, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

## छताचे खपले कोसळत असल्याने विद्यार्थी-शिक्षक जीव मुठीत घेऊन ज्ञानार्जन, स्ट्रक्चर ऑडिट करून पुनर्बांधणीसाठी निधी द्या - डॉ. गणेश ढवळे

लिंबागणेश प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील पिंपळा केंद्रांतर्गत लोणी सय्यदमिर येथील पोकळे वस्तीवरील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची इमारत जीर्णावस्थेत असून छताचे खपले कोसळून विद्यार्थ्यांच्या अंगावर पडत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. त्यामुळे शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, जीव मुठीत घेऊन ज्ञानार्जन करण्याची वेळ विद्यार्थ्यांवर आली आहे.

या शाळेचे तातडीने 'स्ट्रक्चर ऑडिट' करून धोकादायक इमारतीची पुनर्बांधणी करण्यात यावी तसेच नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी जिल्हा वार्षिक नियोजन निधीतून आवश्यक तरतूद करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य, डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रेहमान यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

'स्कूल ठीक करो' अभियानातील पाहणीवर प्रश्नचिन्ह.?

'स्कूल ठीक करो' अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यातील शाळांच्या दुरावस्थेची पाहणी करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करणारे आष्टीचे गटशिक्षणाधिकारी आणि शाळांच्या पाहणीसाठी परवानगी घेण्याच्या सूचना देणारे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रेहमान आता या धोकादायक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी काय पाऊल उचलणार? नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देणार का? असा सवाल डॉ. गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.



१९९८ साली बांधलेली इमारत जीर्ण..

लोणी सय्यदमिर येथील पोकळे वस्तीवरील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पहिली ते चौथीपर्यंतचे वर्ग असून एकूण २६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळेची इमारत सन १९९८ मध्ये षटकोनी आकारात बांधण्यात आली होती.मात्र, सध्या इमारतीची अवस्था अत्यंत खराब झाली असून छताचे खपले कोसळत आहेत.

शाळेच्या इमारतीच्या दुरवस्थेबाबत दरवर्षी वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देऊन पाठपुरावा करण्यात येत असल्याचे शाळेचे मुख्याध्यापक दत्ता मामा शिंदे यांनी डॉ. गणेश ढवळे यांच्याशी बोलताना सांगितले.

विद्यार्थ्यांच्या जीविताशी खेळ नको...

जीर्ण इमारतीत विद्यार्थ्यांना बसवून शिक्षण देणे धोकादायक ठरू शकते. एखादी दुर्घटना घडल्यानंतर प्रशासन जागे होण्यापेक्षा तातडीने स्ट्रक्चर ऑडिट करून सुरक्षित वर्गखोल्या उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देऊन जिल्हा प्रशासन आणि जिल्हा परिषद प्रशासनाने तातडीने निधी मंजूर करावा, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

# १० हजार गोदाम हमालांच्या रोजगारासाठी सप्टेंबरमध्ये एल्गार

## थेट वाहतूक धोरणाविरोधात आक्रमक पवित्रा

### ३१ ऑगस्टला पुण्यात निर्णायक बैठक

बीड प्रतिनिधी

राज्यातील ५०० हून अधिक शासकीय धान्य गोदामांतील सुमारे १० हजार गोदाम हमाल माथाडींचा रोजगार थेट वाहतूक धोरणामुळे धोक्यात आला आहे. शासनाने निर्णय बदलला नाही तर सप्टेंबरमध्ये राज्यव्यापी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा संयुक्त कृती समितीने दिला आहे.

आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी ३१ ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० वाजता हमाल भवन, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे येथे निर्णायक बैठक होणार आहे.

यापूर्वी २५ व २६ मे रोजी कामबंद आंदोलन झाले होते. त्यानंतर अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी बैठक घेऊन गोदाम हमाल बेरोजगार होऊ दिले जाणार नाही, असे आश्वासन दिले होते. मात्र तीन महिने उलटूनही शासन आदेश निघालेला नाही.

बैठकीस हुसेन दलवाई, नरेंद्र पाटील, राजकुमार घायाळ, सुभाष लोमटे, विकास मगदूम, अरुण रांजणे, पोपटराव देशमुख, राजाभाऊ कंक, निवृत्ती धुमाळ, हनुमंत बहिरट, गोरख मेंगडे, संतोष नांगरे आणि शिवाजीराव शिंदे यांच्यासह विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

थेट वाहतूक धोरण तातडीने थांबवून पूर्वीची रोजगाराभिमुख व्यवस्था कायम ठेवावी, माथाडी मंडळाच्या दरानुसार मजुरी व लेव्ही द्यावी, तसेच महागाई निर्देशांकाचा फरक अदा करावा, अशी मागणी समितीने केली आहे.

आश्वासन नको, शासन आदेश हवा; अन्यथा सप्टेंबरमध्ये निर्णायक लढा उभारू, असा इशारा संयुक्त कृती समितीने दिला आहे.



# बीड जिल्ह्यातील आश्रमशाळांच्या मुख्याध्यापकांचा वाबळेवाडी व जालिंदरनगर अभ्यास दौरा

बीड प्रतिनिधी (दिनांक २८): बीड जिल्ह्यातील आश्रमशाळांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थी विकास आणि प्रशासकीय कार्यपद्धती अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने जिल्ह्यातील आश्रमशाळांच्या मुख्याध्यापकांचा जालिंदरनगर येथे अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला आहे. या अभ्यास दौऱ्यासाठी मुख्याध्यापकांचा समूह आज उत्साहात रवाना झाला.

या अभ्यास दौऱ्यादरम्यान आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांचा, निवासी व्यवस्था, विद्यार्थ्यांचे आरोग्य व स्वच्छता, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम, शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर तसेच शाळेच्या प्रशासनाची कार्यपद्धती यांचा प्रत्यक्ष अभ्यास करण्यात येणार आहे.

या दौऱ्यामुळे विविध आश्रमशाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती मुख्याध्यापकांना मिळणार असून, त्याचा उपयोग आपल्या शाळांमध्ये शैक्षणिकदृष्ट्या उपयुक्त उपक्रम राबविण्यासाठी होणार आहे.

अभ्यास दौऱ्यामुळे मुख्याध्यापकांना नवे शैक्षणिक प्रयोग, व्यवस्थापन पद्धती आणि विद्यार्थी-केंद्रित उपक्रम यांची माहिती मिळून आश्रमशाळांच्या शैक्षणिक गुणवत्तेला निश्चितच चालना मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.या अभ्यास दौऱ्यासाठी बीड जिल्ह्यातील आश्रमशाळांचे मुख्याध्यापक, इतर मागास बहूजन कल्याण विभागाचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले आहेत.

# जुगार अड्ड्यावर परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांच्या पथकाची धडक कारवाई

## ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल, १४.४० लाखांचा मुद्देमाल जप्त

बीड प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील अवैध जुगार व इतर अवैध धंद्यांविरुद्ध सुरू असलेल्या कारवाईच्या अनुषंगाने गोपनीय माहितीच्या आधारे परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक श्री. भारत पांढरे यांच्या पथकाने दिंद्रुड पोलीस ठाणे हद्दीत जुगार अड्ड्यावर धडक कारवाई केली. या कारवाईत ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, रोख रक्कम, २ चारचाकी वाहने व ८ मोबाईल फोन असा एकूण १४,४०,०००/-किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



दि. २७.०८.२०२६ रोजी सायंकाळी सुमारे १९.०० वाजता मौजे निथरूड, ता. माजलगाव येथील शिवारात काही इसम जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाली. त्यानुसार परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक श्री. भारत पांढरे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने पंचांसमक्ष सदर ठिकाणी छापा टाकला. कारवाईदरम्यान इसम गोलाकार बसून जुगार खेळताना मिळून आले. त्यांच्या ताब्यातून ४,१०,०००/- रोख रक्कम, अंदाजे ९,००,०००/- किमतीची २ चारचाकी वाहने आणि १,३०,०००/-किमतीचे ८ मोबाईल फोन असा एकूण १४,४०,०००/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर प्रकरणी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, १८८७ चे कलम १२ (अ) अन्वये दिंद्रुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक, बीड श्री. नवनीत कॉंवत, मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके व उपविभागीय पोलीस अधिकारी, माजलगाव श्री. अशोक अनंतरे यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक श्री. भारत पांढरे यांच्या पथकाने केली. कारवाईमध्ये सपोनि महेश भोसले, पोलीस शिपाई अक्षय लोंढे, पोलीस शिपाई कृष्णा काकडे, पोलीस शिपाई सचिन गायकवाड, पोलीस शिपाई पांडुरंग मोटे, पोलीस शिपाई राजाभाऊ मोटे, पोलीस शिपाई कागणे तसेच इतर पोलीस अधिकारी व अंमलदार सहभागी होते. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

# कोल्हापूर सत्र न्यायालयाच्या आवारातून 'बिष्णोई ००७' टोळीचा प्रमुख जेरबंद

## कोल्हापूर स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई

कोल्हापूर प्रतिनिधी

राजस्थानमधील कुख्यात आंतरराज्य 'बिष्णोई ००७' टोळीचा प्रमुख श्यामलाल गोवर्धनराम पुनिया उर्फ बिष्णोई आणि त्याचा साथीदार श्रीराम मांजु उर्फ पाचाराम बिष्णोई या दोघांना कोल्हापूर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने (ङउइ) सत्र न्यायालयाच्या आवारातून सापळा रचून जेरबंद केले.

कोल्हापूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांना राजस्थान तसेच पिंपरी-चिंचवड पोलिसांकडून दोन्ही आरोपी कोल्हापूर न्यायालयात येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक सुशांत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने कारवाईची तयारी केली.

या कारवाईत पिंपरी-चिंचवड खंडणीविरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीनिवास कामुनी, सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर वाघ, पोलीस उपनिरीक्षक संतोष गळवे, सचिन जाधव, अमित सर्जे आणि सुभाष सरवडेकर यांच्यासह अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले.दोन्ही आरोपी पांढऱ्या रंगाच्या ब्रिझा कारमधून न्यायालय परिसरातून बाहेर पडण्याच्या प्रयत्नात असताना पोलिसांनी न्यायालयाचा गेट बंद करून त्यांना अडविले. त्यानंतर दुपारी ११.५० ते १२.१० वाजण्याच्या सुमारास दोघांना ताब्यात घेण्यात आले.

श्यामलाल पुनियावर १७ गंभीर गुन्हे



श्यामलाल गोवर्धनराम पुनिया याच्यावर राजस्थानमध्ये खून, दरोडा, गोळीबार, खुनाचा प्रयत्न यासह तब्बल १७ गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. विशेष म्हणजे, सन २०२० मध्ये किणी टोल नाक्यावर पोलिसांच्या दिशेने गोळीबार केल्याच्या प्रकरणातही त्याचा सहभाग असल्याचे समोर आले आहे.

श्रीराम मांजुवर तब्बल २६ गुन्हे

दुसरा आरोपी श्रीराम मांजु उर्फ पाचाराम बिष्णोई याच्यावर खुनाचा प्रयत्न, दरोडा, बलात्कार, जबरी चोरी, घरफोडी, चोरी यांसह तब्बल २६ गंभीर गुन्हे दाखल असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे.

न्यायालय परिसरात सापळा; ङउइची अचूक कारवाई

राजस्थानमधून महाराष्ट्रात येणाऱ्या या कुख्यात आरोपींच्या हालचालींची माहिती मिळताच पोलिसांनी अत्यंत गोपनीय पद्धतीने न्यायालय परिसरात सापळा रचला. आरोपी कारमधून बाहेर पडण्याच्या तयारीत असतानाच पोलिसांनी त्यांना घेरल्याने 'बिष्णोई ००७' टोळीच्या प्रमुखासह साथीदाराला पळून जाण्याची संधीच मिळाली नाही.

या कारवाईमुळे राजस्थान आणि महाराष्ट्रात सक्रिय असलेल्या या टोळीच्या गुन्हेगारी कारवायांबाबत आणखी माहिती समोर येण्याची शक्यता असून, दोन्ही आरोपींच्या पुढील चौकशीत आणखी गुन्ह्यांचा उलगडा होण्याची शक्यता आहे.

# दोन तृतीयांश पेन्शन प्रकरणी पुणे जिल्हाधिकाऱ्यांना मॅटचा दणका..!

१० हजारांचा जामीनपात्र वॉरंट

मुंबई प्रतिनिधी

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणासमोर सुरू असलेल्या श्री. कांताराम धोंडू ताटले यांच्या पेन्शन प्रकरणात प्रतिवादींकडून न्यायाधिकरणाच्या निर्देशांचे पालन न झाल्याने न्यायाधिकरणाने कडक भूमिका घेतली आहे. १९ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या सुनावणीत प्रतिवादींकडून उत्तर दाखल करण्यात आले नसल्याचे तसेच प्रतिवादी अनुपस्थित राहिल्यामुळे न्यायाधिकरणाने प्रतिवादी पुणे जिल्हाधिकारी यांच्याविरुद्ध १० हजार रुपयांचा जामीनपात्र वॉरंट बजावण्याचे निर्देश दिले असून प्रकरणाची पुढील सुनावणी १५ सप्टेंबर २०२६ रोजी ठेवली आहे. याचिकाकर्ते यांच्या वतीने अँडव्होकेट भूषण बांदिवडेकर यांनी काम पाहिले. त्यांना

अँड. अरविंद बांदिवडेकर व अँड. भूषण बांदिवडेकर यांनी सहाय्य केले.

या प्रकरणात श्री. ताटले यांनी त्यांच्या सक्तीच्या सेवानिवृत्तीच्या आदेशाला आव्हान देत पुणे जिल्हाधिकारी व पुणे विभागीय आयुक्त यांना प्रतिवादी करत महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात याचिका दाखल केली आहे. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम १०० अन्वये २/३ पेन्शन व ग्रॅच्युइटीचा लाभ मिळावा, यासाठी स्वतंत्र अर्ज करण्यात आला आहे. अर्जात १ ऑक्टोबर २०१५ पासून दोन तृतीयांश पेन्शन देण्याची तसेच दोन तृतीयांश ग्रॅच्युइटी अदा करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या मागणी संदर्भात ५ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या सुनावणीत न्यायाधिकरणाने प्रतिवादींना तातडीने उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले होते. पुढील तारखेपर्यंत उत्तर प्राप्त न झाल्यास प्रतिवादी क्रमांक १ यांनी वैयक्तिकरित्या उपस्थित राहावे, असेही आदेशात नमूद करण्यात आले होते. मात्र, १९ ऑगस्टच्या सुनावणीवेळीही न्यायाधिकरणाच्या पूर्वीच्या निर्देशानुसार उत्तर दाखल झाले नसल्याचे आणि प्रतिवादी क्रमांक १ उपस्थित नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे न्यायाधिकरणाने १० हजार रुपयांचा जामीनपात्र वॉरंट काढण्याचे आदेश दिले. हा वॉरंट एका आठवड्यात परत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले असून प्रकरण १५ सप्टेंबर २०२६ रोजी पुढील सुनावणीसाठी ठेवण्यात आले आहे.




# चोरट्यांच्या चालाखी पुढे पोलीसांचीबेडी कमकजोर?

पूर्णाप्रतिनिधी/

पूर्णावपरिसरामध्येमागीलमहिन्याभरात ऐन पोलीस ठाण्याच्या गेट समोरील मा.नगराध्यक्षांसह ८घरफोड्याजबरी चोऱ्याकरून पूर्णापोलिसांनाअक्षरश;जेरीसआणण रिचोरटेपोलिसांच्याबेडीतअडकता आडकेणासेझाल्यानेपोलिसांच्या बेडी खरंच कमकुवत झाली का.? असा प्रश्न निर्माण होतो आहे. चोरट्यांचा साधा सुगावाहीन लावता आल्यानेपुर्णेकरांत असुरक्षितेच ीभावनानिर्माणझालीअसून,पोलीसांशी चोरट्यांशी सलोख्याचे संबंध तर नाहीत ना अशा उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे.चो-यांचा गुन्ह्यांची उकल करण्यास अपयशी ठरलेल्या जबाबदारांवर जिल्हा पोलीस दलाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याने आता याप्रकरणी नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी यात लक्ष घालून योग्य ती कारवाई अशी मागणी पूर्णेकरांकडुन केली जात आहे.

पुर्णा शहरात २७ जुलै ते २० ऑगस्ट या कालावधीत सिद्धार्थनगर येथील शिवगंगा अहिरे, पोलीस ठाण्याच्या गेटसमोरील रस्त्यावरील माजी नगराध्यक्ष स्व. सुभाषसिंह ठाकूर यांचे घर, कानखेड येथील मारुती वैद्य व मारुती धोत्रे यांच्या घरात घरफोडी झाल्याच्या घटना घडल्या.याशिवाय शहरातील महावीरनगर भागातील डॉक्टर लेन व महाराष्ट्र बँक परिसरात चोरट्यांनी धाडसी चो-या करत. सुभद्रा ज्वेलर्स, शिवा झेरॉक्स, पलसिद्ध व कनिष्क ग्राहक सेवा केंद्र अशी चार दुकाने फोडून चोरट्यांनी लाखो रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. दरम्यान याघटनांची उकल करण्यासाठी जिल्हा पोलीस दलाने पुर्णा पोलीसांच्या मदलीला मोठं मोठ्या गुन्ह्यांची उकल करण्यास तरबेज असलेल्या स्था.गु.शाखेच्या पथकाला तपासासाठी पाठवले.परंतु या पथकालाही आजपावेतो धागेदोरे सापडले नाहीत.पुर्णा पोलीस ठाण्यात अधिकारी कर्मचारी असा शेकड्याहुन अधिक कर्मचाऱ्यांचा सुसज्ज ताफा आहे.

# कृष्णा घाट खून प्रकरणातील 'आर. के. गँग'वर मोक्का

दोन बालकांसह ८ जणांवर कारवाई

सांगली । सांगली शहरातील कृष्णा घाटावर झालेल्या खून प्रकरणातील कुख्यात 'आर. के. गँग' टोळीविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) अंतर्गत कारवाई करण्यास कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक रंजन कुमार शर्मा यांनी मंजुरी दिली आहे. टोळीतील दोन अल्पवयीन बालकांसह एकूण आठ आरोपींवर मोक्काची कारवाई करण्यात आली आहे.

टोळीप्रमुख राकेश शामराव कांबळे (३१) याच्यासह लक्ष्मण इसरडे, कृष्णा उर्फ मुथ्या कांबळे, करण शिंदे, महेश नाटेकर, सुनील उर्फ भुऱ्या खड्डे आणि दोन बालकांचा टोळीत समावेश आहे. या टोळीने २०१६ पासून सांगली शहर व विश्रामबाग परिसरात खून, खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, गंभीर दुखापत, अवैध शस्त्र बाळगणे, अवैध दारू विक्री तसेच नागरिकांमध्ये दहशत निर्माण करण्यासारखे गंभीर गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

सांगली शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरुण सुगांवकर यांनी मोक्काचा प्रस्ताव तयार करून पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांच्याकडे सादर केला होता. अधीक्षक दोशी यांनी प्रस्तावाची शिफारस करून तो विशेष पोलीस महानिरीक्षक रंजन कुमार शर्मा यांच्याकडे पाठविला. प्रस्तावाचे



अवलोकन केल्यानंतर शर्मा यांनी मोक्का कायद्यातील कलमांचा समावेश करून पुढील तपासास मंजुरी दिली.

यापूर्वी सांगलीतील वेदांत मारुती बंडगर खून प्रकरणातील 'एन. जी. ग्रुप' या टोळीवरही मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. संघटित गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी अशा टोळ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई सुरूच राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

या कारवाईत विशेष पोलीस महानिरीक्षक रंजन कुमार शर्मा, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती कल्पना बारवकर, ईश्वरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी अरुण पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीव झाडे, पोलीस निरीक्षक अरुण सुगांवकर, तसेच नाईक शिंदे, दीपक गाडे, गणेश कांबळे आणि गणेश कोळेकर यांचे योगदान राहिले.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी अरुण पाटील यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे.



# योगेश्वरी प्रा.विद्यालयात रक्षाबंधन उत्साहात

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील यो.शि.संस्था संचलित योगेश्वरी प्रा.विद्यालय ( स्वा.रा. ती. रुग्णालय परिसर) येथे 'रक्षाबंधन' मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानी संचालक सय्यद पाशु करीम होते.मंचावर डॉ.सिध्देश्वर बिराजदार,पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे,सामाजिक कार्यकर्ते अनिकेत लोहिया,अभियंता नवनाथ गायकवाड, विभाग प्रमुख व्यंकटेश चामनर, शिक्षक प्रतिनिधी, अनंत जोशी,एच.के. इंगळेवाड,कल्पना कुडमतकर,आकाश घाडगे आदी उपस्थित होते.

व्यंकटेश चामनर यांनी रक्षाबंधन सणाचे प्राचीन व ऐतिहासिक महत्त्व सांगितले. रक्षाबंधनाचे औचित्य साधून बंध जिव्हाळ्याचे.... रक्षा सुत्र कृतज्ञेचे हा कार्यक्रम उत्साहात साजरा झाला. विद्यालयातील मुलींनी मुलांना तसेच वृक्षांना आकर्षक राख्या बांधल्या. तसेच राखी निर्मिती स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीसे देण्यात आली. मानवलोक संस्थेच्या वतीने विद्यालयास टी.व्ही.संच भेट देण्यात आला. संचालन प्राजक्ता गोस्वामी, आभार नम्रता पेठे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षकेत्तर कर्मचारी वृंदांनी परिश्रम घेतले

# रक्षाबंधनाची अनोखी भेट, बीड पोलिसांकडून चोरीस गेलेले दागिने व मौल्यवान मुद्देमाल नागरिकांना परत

## पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या निर्देशानुसार विशेष उपक्रम

शिवाजीनगर, चकलंबा, गेवराई व माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यांची उल्लेखनीय कामगिरी

बीड प्रतिनिधी

रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांची हक्काची व कष्टाची मालमत्ता त्यांना परत मिळावी तसेच पोलीस व नागरिकांमधील विश्वासाचे नाते अधिक दृढ व्हावे, या उद्देशाने पोलीस अधीक्षक, बीड श्री. नवनीत कॉवत यांनी जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना त्यांच्या पोलीस ठाण्यांमध्ये उपलब्ध असलेला चोरीस गेलेला व तपासा दरम्यान हस्तगत झालेला किमती मुद्देमाल तपासून, आवश्यक त्या सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून रक्षाबंधनाच्या निमित्ताने संबंधित मालकांना परत करण्याचे निर्देश दिले होते.

पोलीस अधीक्षक यांच्या या नागरिककेंद्री व संवेदनशील उपक्रमाच्या अनुषंगाने शिवाजीनगर, चकलंबा, गेवराई व माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यांनी विविध गुन्ह्यांमध्ये हस्तगत केलेला मौल्यवान मुद्देमाल तसेच शोधून काढलेले हरविलेले मोबाईल फोन आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मूळ मालकांच्या स्वाधीन केले. रक्षाबंधनाच्या निमित्ताने नागरिकांना त्यांच्या मौल्यवान वस्तू परत मिळणे ही बीड पोलिसांकडून नागरिकांना दिलेली एक अनोखी भेट ठरली आहे.

शिवाजीनगर पोलीस ठाणे- चोरीस गेलेले सोन्याचे दागिने महिलांना परत

शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या पथकाने चोरीच्या घटनांचा तत्परतेने तपास करून हस्तगत केलेला सोन्या-चांदीचा मुद्देमाल कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून संबंधित महिलांना परत केला. राजीव गांधी चौक, बीड येथील राहत्या घरातून सोन्या-चांदीचे दागिने चोरीस गेल्याच्या गुन्ह्याचा सखोल तपास करून पोलिसांनी ३,३७,२८०/-



किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने तपासा दरम्यान हस्तगत केलेले. तसेच परळी येथील महिला बीड बसस्थानक येथे बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन चोरीस गेलेले २८,९८५/- किमतीचे सोन्याचे मिनी गंठण तत्पर कारवाई करून आरोपीस अटक करत हस्तगत करण्यात आलेले होते.

सर्व आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांच्या हस्ते दोन्ही महिलांना त्यांचा मुद्देमाल परत करण्यात आला. रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला कष्टाने मिळवलेले दागिने पुन्हा मिळाल्याने दोन्ही महिलांनी समाधान व्यक्त करत बीड पोलिसांचे आभार मानले.चकलंबा पोलीस ठाणे - २.५५ लाखांचे सोन्याचे दागिने परत

चकलंबा पोलीस ठाणे गु.र.नं. २५६/२०२६ मधील तपासादरम्यान जप्त करण्यात आलेले २,५५,०००/- किमतीचे सोन्याचे दागिने सर्व आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून रक्षाबंधनाच्या निमित्ताने संबंधित तक्रारदारास परत करण्यात आले.

गेवराई पोलीस ठाणे - मुद्देमाल आणि १० हरविलेले मोबाईल मूळ मालकांना परत

गेवराई पोलीस ठाण्याने रक्षाबंधनाच्या दिवशी विशेष कामगिरी बजावत एकूण चार मौल्यवान जप्त मुद्देमाल मूळ मालकांना परत केले. यासोबतच पोलिसांनी नागरिकांचे एकूण १० हरविलेले मोबाईल फोन शोधून काढून तेही त्यांच्या मूळ मालकांच्या स्वाधीन केले. हरविलेल्या वस्तू परत मिळाल्याने संबंधित नागरिकांनी बीड पोलिसांचे आभार मानले.

माजलगाव ग्रामीण पोलीस ठाणे - न्यायालयाच्या आदेशानंतर ३२ हजारांचा मुद्देमाल परत

माजलगाव ग्रामीण पोलीस ठाणे गु.र.नं. १५३/२०२६, कलम ३३१(४), ३०५ (-) इछड अन्वये दाखल गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला ३२,०००/- किमतीचा मौल्यवान मुद्देमाल मा. न्यायालयाच्या आदेशानुसार तक्रारदारास परत करण्यात आला.

रक्षाबंधनाच्या निमित्ताने राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून नागरिकांच्या हक्काची मालमत्ता त्यांना परत मिळवून देण्यासाठी बीड पोलीस कटिबद्ध आहेत, हा विश्वास अधिक दृढ झाला आहे. चोरीस गेलेल्या अथवा हरविलेल्या मालमत्तेचा शोध घेऊन, आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ती मूळ मालकांना परत मिळवून देण्यासाठी बीड जिल्हा पोलीस सातत्याने प्रयत्नशील आहेत.पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांच्या संवेदनशील आणि नागरिककेंद्री नेतृत्वाखाली राबविण्यात आलेला हा उपक्रम पोलीस व नागरिकांमधील विश्वासाचे नाते अधिक दृढ करणारा ठरला आहे. रक्षाबंधनाच्या पवित्र सणानिमित्त नागरिकांना त्यांच्या कष्टाची आणि हक्काची मौल्यवान मालमत्ता परत मिळवून देत बीड पोलिसांनी रक्षाबंधनाची अनोखी भेट दिली आहे.

## तृतीय श्रावण सोमवारी मालेगाव खु. येथे कीर्तनाचे भव्य आयोजन.

गेवराई दि(प्रतिनिधी): तालुक्यातील मालेगाव खु. येथील प्रसिद्ध पावलेले व्येसन मुक्ती महादेव मंदिर येथे तिसऱ्या श्रावणी सोमवार निमित्त जाहीर हरी किर्तनाचा आणि महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. याचा लाभ भाविकभक्तानी घ्यावा.

या बाबत अधिकृत असे कि मालेगाव खु. येथील मुस्लीम महादेव भक्त श्री शेख रसूल उस्मान महाराज यांनी गेल्या २७ वर्षापासून जवळपास तब्बल ३० हजार हून अधिक भक्तांना लोकांना व्यसनापासून मुक्ती दिली आहे. त्यांना गावातील प्रतिष्टीत व्यक्ती कै. दादासाहेब जयवंतराव खराद यांनी मंदिर उभारण्याकरता मोफत जमीन दिली होती. येथे अखंड पने व्येसन मुक्ती कार्य सुरु आहे. येत्या ३१ ऑगस्ट रोजी श्रावणी सोमवार निमित्त हरी कीर्तनाचे आयोजन करण्यात आले असून प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प.श्री विष्णू महाराज अंतरकर (गा.जळगाव) यांचे हरिकीर्तन होणार असून व मा. माझी आमदार अमरसिंहजी पंडित यांच्या हस्ते महादेवाला अभिषेक करण्यात येणार आहे व महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे .या अभूतपूर्व सोहळयास पंचकृषीतील भाविक भक्तांनी उपस्थित राहून हरी कीर्तनाचा लाभघ्यावा असे आवाहन सर्व ग्रामस्त व श्री शेख रसूल महाराज यांनी केले आहे.

## नेशन बिल्डर अवॉर्डसाठी प्रस्ताव पाठविण्याचे रोटरी क्लब गेवराईचे आवाहन

गेवराई, दि.२८ (प्रतिनिधी)- सेवा,प्रामाणिकपणा आणि दातृत्व या विचाराने सुरू झालेल्या रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या वतीने यावर्षासाठी गेवराई तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक शिक्षकांकडून राष्ट्र निर्माण पुरस्कार (नेशन बिल्डर अवॉर्ड) साठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

गेवराई येथे एक वर्षापूर्वी स्थापन झालेल्या रोटरी क्लबचे हे दुसरे वर्ष आहे. गेल्यावर्षी तालुक्यातील संतोष कोठेकर, महेंद्र मवाडे, विष्णू जाधव, दक्षा वानखेडे, राम चौधरी या आदर्श शिक्षकांना २०२४-२०२५ या वर्षाचा नेशन बिल्डर अवॉर्ड प्रदान करण्यात आला होता. रोटरी क्लबचा मानाचा पुरस्कार मिळावा म्हणून तालुक्यातून अक्षरशः प्रस्तावांचा पाऊस पडला होता. रोटरी क्लबने यावर्षीही ५ शिक्षकांना पुरस्कार देण्यात येणार आहे. भव्य समारंभात सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, महावस्त्र, मानपत्र लवकरच मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येईल. रोटरी क्लबने पुरस्कार निवड समिती गठित केली असून याकरिता तालुक्यातील शिक्षकांनी आपले परिपूर्ण प्रस्ताव दि.४ सप्टेंबर २०२६ पर्यंत धर्मराज करपे, सचिव, रोटरी क्लब ऑफ गेवराई,द्वारा. संतोष कोठेकर निवास, बेद्रे लॉन्ससमोर, कोल्हेर रोड,गेवराई जि. बीड (४३११२७) या पत्त्यावर पाठवावेत अथवा प्रत्यक्ष आणून द्यावेत. अधिक माहितीसाठी रोटरी क्लब ऑफ गेवराईचे अध्यक्ष रो. गणेश कुलकर्णी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



## फौजदार किंवा नायब तहसीलदार होणाऱ्या विद्यार्थ्याला तब्बल २ लाखांचे प्रोत्साहनपर बक्षीस-माजी आ.भीमराव धोंड

आष्टी (एस.राजेंद्र लाड) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देत त्यांच्या अधिकारी होण्याच्या स्वप्नांना बळ देण्याच्या उद्देशाने आष्टी येथील भगवान महाविद्यालय संचलित बाबाजी करिअर अकॅडमीमध्ये उभारण्यात आलेल्या अद्ययावत संगणक लॅबचे उद्घाटन शिक्षण महर्षी तथा माजी आ. भीमराव धोंडे यांच्या शुभहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. यावेळी माजी आ. भीमराव धोंडे यांनी बाबाजी करिअर अकॅडमीमधून स्पर्धा परीक्षांची तयारी करून फौजदार किंवा नायब तहसीलदार होणाऱ्या विद्यार्थ्यास तब्बल दोन लाख रुपयांचे प्रोत्साहनपर बक्षीस देण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी परिस्थितीवर मात करून स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करावे, शासकीय सेवेत अधिकारी म्हणून कार्यरत व्हावे आणि आपल्या कुटुंबासह आष्टी तालुक्याचे नाव उज्वल करावे, या उद्देशाने करण्यात आलेली ही घोषणा विद्यार्थ्यांसाठी मोठी प्रेरणादायी ठरणार आहे.

स्पर्धा परीक्षांच्या बदलत्या स्वरूपामुळे विद्यार्थ्यांना आता पारंपरिक अभ्यासाबरोबरच संगणकाचे ज्ञान आणि ऑनलाइन परीक्षांचा नियमित सराव असणे अत्यंत आवश्यक झाले आहे. अनेक स्पर्धा परीक्षा संगणकाच्या माध्यमातून घेतल्या जात असल्याने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष परीक्षेपूर्वी संगणकावर प्रश्न सोडविण्याचा पुरेसा सराव होणे गरजेचे आहे. ही गरज लक्षात घेऊन बाबाजी करिअर अकॅडमीमध्ये अद्ययावत संगणक लॅबची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेमुळे विद्यार्थ्यांना ऑनलाइन सराव परीक्षा, मॉक टेस्ट, विविध विषयांच्या प्रश्नपत्रिकांचा सराव, डिजिटल अभ्यास साहित्य, ऑनलाइन शैक्षणिक सामग्री तसेच संगणक आधारित परीक्षांचे वातावरण यांचा अनुभव घेता येणार आहे. परिणामी विद्यार्थ्यांचा अभ्यास अधिक नियोजनबद्ध होण्याबरोबरच वेळेचे व्यवस्थापन, प्रश्न सोडविण्याचा वेग आणि अचूकता वाढण्यास मदत होणार आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तेची कमतरता नसली तरी त्यांना शहरातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत आधुनिक शैक्षणिक साधने आणि स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक सुविधा अनेकदा मर्यादित प्रमाणात उपलब्ध होतात. अशा परिस्थितीत बाबाजी करिअर अकॅडमीने विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्याच्या दृष्टीने उचललेले हे पाऊल महत्त्वाचे मानले जात आहे. स्पर्धा परीक्षेच्या तयारीत सातत्य, योग्य मार्गदर्शन, सराव आणि आत्मविश्वास या बाबी अत्यंत महत्त्वाच्या असतात. संगणक लॅबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नियमितपणे सराव करण्याची संधी मिळणार असल्याने त्यांच्या तयारीला अधिक व्यापक आणि परिणामकारक स्वरूप प्राप्त होणार आहे.

याच कार्यक्रमात माजी आ. भीमराव धोंडे यांनी विद्यार्थ्यांसाठी दोन लाख रुपयांच्या प्रोत्साहनपर बक्षिसाची घोषणा करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. बाबाजी करिअर अकॅडमीतून तयारी करून फौजदार किंवा नायब तहसीलदार होणाऱ्या विद्यार्थ्याला दोन लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येईल, असे त्यांनी जाहीर केले. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत, त्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी कठोर परिश्रम करावेत आणि अपयश आले तरी खचून न जाता सातत्याने प्रयत्न करावेत, यासाठी ही घोषणा प्रेरणादायी ठरणार आहे. विशेषतः ग्रामीण आणि सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारचे प्रोत्साहन त्यांच्या मेहनतीला मोठे बळ देणारे ठरणार आहे.फौजदार किंवा नायब तहसीलदार होण्याचे स्वप्न अनेक विद्यार्थी उराशी बाळगतात. मात्र स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणात अभ्यास, नियमित सराव, चालू घडामोडींचे ज्ञान, विषयाची सखोल समज, वेळेचे काटेकोर नियोजन आणि परीक्षेच्या पद्धतीशी जुळवून घेण्याची क्षमता आवश्यक असते. बाबाजी करिअर अकॅडमीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना यासाठी आवश्यक मार्गदर्शन आणि शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
राजमान्य-राजशक्ती



# करंजी (पांढरी) प्रकल्पातील बचतीचे पाणी बंदिस्त नलिकेद्वारे जामगाव तलावात जाणार

आ.सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नांना यश

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघातील सिंचन व्यवस्थेला बळकटी देण्याच्या दृष्टीने भाजपा आमदार आ. सुरेश आण्णा धस यांच्या विशेष प्रयत्नांना आणखी एक महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. आष्टी तालुक्यातील करंजी (पांढरी) लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या डाव्या कालव्याचे बंदिस्त नलिका प्रणालीमध्ये (पीडीएन) रूपांतर करून होणाऱ्या पाणी बचतीतून जामगाव पाझर तलावात पाणी सोडण्याच्या प्रस्तावाला महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाने तत्त्वतः मान्यता दिली आहे. यासंदर्भात जलसंपदा विभागाने दि. ३ ऑगस्ट २०२६ रोजी शासनाच्या उपसचिवांच्या स्वाक्षरीने अधिकृत पत्र जारी केले आहे. त्यामुळे करंजी (पांढरी) प्रकल्पातील उपलब्ध पाण्याचा अधिक कार्यक्षम वापर होऊन जामगाव परिसरातील जलसाठा आणि सिंचन व्यवस्थेला चालना मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

शासनाच्या निर्णयानुसार करंजी (पांढरी) लघुपाटबंधारे प्रकल्पाचा डावा कालवा बंद नलिका प्रणालीमध्ये रूपांतरित करण्यात येणार आहे. सध्या कालव्यामधून पाणी वाहून नेताना होणारी गळती, झिरपणे तसेच बाष्पीभवनामुळे होणारी संभाव्य पाण्याची हानी बंदिस्त नलिका प्रणालीमुळे कमी होण्यास मदत होणार आहे. परिणामी उपलब्ध पाण्याचा अधिकाधिक उपयोग सिंचनासाठी करता येणार असून बचत होणाऱ्या पाण्याचा विनियोग जामगाव पाझर तलावासाठी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. डाव्या कालव्यामधून अतिरिक्त नवीन विमोचकाद्वारे बंदिस्त नलिका प्रणालीच्या माध्यमातून जामगाव पाझर तलावात पाणी सोडण्यात येणार आहे.

या कामासाठी आवश्यक असलेले सर्वेक्षणाचे काम विस्तार व सुधारणांतर्गत प्रस्तावित करण्यास शासनाने तत्त्वतः मान्यता दिली आहे. तसेच महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या मराठवाडा विभागासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात सर्वेक्षणाच्या कामासाठी उपलब्ध असलेल्या प्राथमिक सर्वेक्षणाच्या ठोक तरतुदीतून हे काम हाती घेण्यासही शासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे आता आवश्यक सर्वेक्षण, तांत्रिक तपासणी आणि पुढील प्रशासकीय प्रक्रियेला गती मिळण्याची अपेक्षा आहे.



आष्टी तालुका हा पर्जन्यमानाच्या अनिश्चिततेमुळे वारंवार दुष्काळसदृश परिस्थितीला सामोरा जाणारा तालुका आहे. पावसाचे प्रमाण कमी-जास्त होत असल्याने उपलब्ध जलसाठ्याचे योग्य नियोजन करणे आणि साठवलेल्या पाण्याचा काटकसरीने वापर करणे ही काळाची गरज बनली आहे. या पार्श्वभूमीवर करंजी (पांढरी) प्रकल्पाच्या कालव्याचे बंदिस्त नलिका प्रणालीमध्ये रूपांतर करण्याचा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. कालव्यातून होणारी पाण्याची गळती आणि बाष्पीभवनामुळे होणारी हानी कमी झाल्यास बचत होणारे पाणी अन्य जलसाठ्यासाठी वापरता येणार आहे. त्यामुळे उपलब्ध जलसंपत्तीचा अधिक शास्त्रशुद्ध आणि कार्यक्षम पद्धतीने उपयोग होण्यास मदत होणार आहे.

जामगाव पाझर तलावात करंजी (पांढरी) प्रकल्पातील बचतीचे पाणी उपलब्ध झाल्यास या परिसरातील सिंचन व्यवस्थेलाही त्याचा सकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे. पाझर तलावातील जलसाठा वाढल्यास परिसरातील शेतीसाठी पाण्याची उपलब्धता सुधारण्यास मदत होऊ शकते. तसेच भूजलपातळीवरही त्याचा अप्रत्यक्ष परिणाम होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे या प्रकल्पाचा लाभ केवळ पाणीपुरवठ्यापुरता मर्यादित न राहता परिसरातील कृषी व्यवस्थेलाही होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघातील सिंचनविषयक प्रश्नांना प्राधान्य देत आ. सुरेश आण्णा धस यांनी करंजी (पांढरी) प्रकल्पातील पाण्याचा अधिक कार्यक्षम वापर करून जामगाव पाझर तलावाला पाणी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांनंतर जलसंपदा विभागाने या प्रस्तावाला तत्त्वतः मान्यता दिल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शासनाची तत्त्वतः मान्यता मिळाल्याने आता सर्वेक्षण आणि तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला गती देणे महत्त्वाचे ठरणार आहे. बंदिस्त नलिका प्रणालीचे काम पूर्ण झाल्यानंतर पाणी वाहतुकीतील नुकसान कमी होऊन उपलब्ध पाण्याचा अधिक कार्यक्षम वापर होईल. त्यातून बचत होणारे पाणी जामगाव पाझर तलावात सोडल्यास या भागातील जलसाठा वाढण्यास आणि सिंचन क्षमतेला चालना मिळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे करंजी (पांढरी) प्रकल्पातील पाणी जामगाव तलावात वळविण्याचा हा निर्णय आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी भविष्यातील जलव्यवस्थापनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

# दादासाहेब बोराडे यांना पुण्यानुमोदन व जलदान विधीद्वारे भावपूर्ण आदरांजली

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील केळसांगवी येथील प्रगतशील शेतकरी तथा कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व सरपंच परिवंत गायकवाड यांचे मेहुणे बुद्धवासी दादासाहेब मरिबा बोराडे यांच्या निधनानंतर त्यांच्या पवित्र स्मृतींना वंदन करण्यासाठी समस्त बोराडे परिवाराच्या वतीने 'पुण्यानुमोदन व जलदान विधी' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दिवंगत दादासाहेब बोराडे यांना भावपूर्ण आदरांजली वाहिली.




कार्यक्रमाच्या प्रारंभी भगवान गौतम बुद्ध, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच बुद्धवासी दादासाहेब बोराडे यांच्या प्रतिमांचे विधिवत पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. यानंतर उपस्थितांनी बुद्ध वंदना केली तसेच त्रिशरण व पंचशील ग्रहण केले. दादासाहेब बोराडे यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या आत्म्यास सद्गती लाभावी, यासाठी सामूहिक पुण्यानुमोदन अर्पण करण्यात आले.

जलदान विधीच्या माध्यमातून दिवंगत दादासाहेब बोराडे यांच्या सामाजिक, कौटुंबिक आणि शेती क्षेत्रातील योगदानाचे स्मरण करण्यात आले. त्यांच्या मनमिळावू स्वभावामुळे व आपुलकीच्या वागणुकीमुळे त्यांचा मोठा मित्रपरिवार व हितचिंतक वर्ग होता. त्यांच्या निधनाने बोराडे परिवारासह नातेवाईक व परिसरातील नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त करण्यात आली.

यावेळी अशोक साळवे, अरुणभैय्या निकाळजे, यशवंत खंडागळे, वामनराव निकाळजे, रत्नदीप निकाळजे, सुनील शिंदे, उत्तम बोडखे, नवनाथ विधाते, सौ. वंदना गायकवाड, सतीश गायकवाड, जालिंदर गायकवाड, सरपंच अजित घुले, भाऊसाहेब घुले, दत्तात्रय घुले यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, प्रतिष्ठित नागरिक, नातेवाईक, आप्तेष्ट आणि बोराडे परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी दादासाहेब बोराडे यांच्या जीवनातील विविध आठवणींना उजाळा देत त्यांच्या कर्तृत्वाचे व व्यक्तिमत्त्वाचे स्मरण केले. तसेच बोराडे परिवाराच्या दुःखात सहभागी होत कुटुंबीयांना धीर दिला. दादासाहेब बोराडे यांच्या स्मृती सदैव प्रेरणादायी राहतील, अशा भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केल्या. शांतता, समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या बौद्ध परंपरेनुसार पार पडलेल्या या पुण्यानुमोदन व जलदान विधीने दादासाहेब बोराडे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



केज/प्रतिनिधी

केज येथील बाबुरावजी आडसकर महाविद्यालय,केज येथील विज्ञान शाखेची विद्यार्थिनी मुस्कान पठाण हिने कळंब येथील शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब व आगाज फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिके प्राप्त केले आहे.या पारितोषिकाचे स्वरूप स्मृती चिन्ह,तीन हजार रुपये व प्रमाणपत्र असे आहे.मुस्कान पठाण च्या या यशाबद्दल छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव रमेशराव आडसकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजी नगरच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या सौ.अर्चनाताई आडसकर,प्राचार्य डॉ. अनिल किर्दंत, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.सी.एन. सोळंके यांनी अभिनंदन केले आहे.

या स्पर्धेत इतर सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली.या विद्यार्थ्यांना डॉ.सौ.आशा बोबडे, डॉ.सौ.आर.व्ही.गंगणे यांनी मार्गदर्शन केले.

# सोळा गावात पुरुष तर आठ गावांत महिला शेतकरी मित्र ! महिला आरक्षणासाठी आठ गाव सोडत पध्दतीने !

## दहा सप्टेंबर पर्यंत ईच्छुकांनी आपले अर्ज सादर करावे !

मानूर प्रतिनिधी ह्व

पोलीस मित्राच्या धरतीवर आता कृषी क्षेत्रात देखील शेतकरी मित्र म्हणून काम करण्याची संधी प्राप्त झाली असुन शिरूर तालुक्यात चोवीस शेतकरी मित्र म्हणून निवड होणार असुन महिलांना देखील यात संधी मिळणार असुन आठ गावात त्यांच्यासाठी राखीव म्हणून सोडतीद्वारे निश्चित केले आहे .

ईच्छुकांनी आपले अर्ज दहा सप्टेंबर पर्यंत सादर करावेत असे आवाहन तालुका कृषी अधिकारी अमृत गांगुर्डे यांनी केले आहे .

शेतकरी मित्रांना शासनाकडून मानधन देण्यात येणार असल्याचे सांगितले गेले .

कृषी कर्मचारी थेट शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन मार्गदर्शन करतात मात्र कधी कधी एकाच वेळेस दोन किंवा त्याहून अधिक ठिकाणी जावे लागल्यास काही शेतकऱ्यांना त्यांची समस्या व प्रश्न पडल्यास त्याचे निराकरण करण्यास कृषी कार्यालयाकडे वेळ शिल्लक राहत नाही ,ही गैरसोय दूर करण्यासाठी हंगामी शेतकरी मित्राची निधड प्रक्रीया कामाचा भार हलका करेल .

आठ गावात महिलासाठी राखील ठेवण्यासाठी आरक्षण सोडत .

ही गांव महिलासाठी राखीव !

राक्षहभुवन ,पांगरी ,लोणी ,वंजारवाडी ,पाडळी ,आर्वी ,हिवरसिंगा व तिंतरवणी ही गाव महिला शेतकरी मित्रासाठी आरक्षण जाहिर झाले ,उर्वरित पुरूष शेतकरी मित्र निवड होणार आहे त्यासाठी आपला अर्ज सहा .कृषी अधिकारी यांचे मुख्यालयाच्या ग्राम कृषी विकास समितीकडे सादर करण्याचे आवाहन ता.कृ .अ.अमृत गांगुर्डे यांनी केले आहे.

अर्जा सोबत जोडा ही कागदपत्र !

ईच्छुक उमेदवारांनी आपल्या अर्जासोबत सातबारा ,आठ ते अ ,आधार कार्ड ,पासबुक झेरॉक्स,शैक्षणीक पात्रता कमीत कमी बारावी पास ,फार्मर आय डी ,चारित्र पडताळणी प्रमाणपत्र , रहिवाशी प्रमाण पत्र प्रवाशी , अनुसुचित जाती व जमातीसाठी जात प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

# लोकनेते सुंदररावजी सोळंके पतसंस्थेतर्फे २२.५० लाखांचा लाभांश

## भविष्यात सभासदांना अधिकाधिक लाभांश देणार : चेअरमन वीरेंद्र सोळंके

माजलगाव (प्रतिनिधी): लोकनेते सुंदररावजी सोळंके नागरी सहकारी पतसंस्था मर्या., माजलगावच्या आर्थिक प्रगतीत सभासदांचा विश्वास आणि कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगत, भविष्यातही संस्थेच्या माध्यमातून सभासदांना जास्तीत जास्त लाभांश देण्याचा प्रयत्न राहणार आहे, असे संस्थेचे चेअरमन श्री. वीरेंद्र प्रकाश सोळंके यांनी सांगितले. संस्थेने आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि विश्वासार्ह व्यवहाराला प्राधान्य देत सभासदांच्या हिताला केंद्रस्थानी ठेवले आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये संस्थेला २ कोटी २४ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला असून, त्यातून सभासदांना १० टक्के लाभांश, म्हणजेच २२ लाख ५० हजार रुपयांची रक्कम त्यांच्या बचत खात्यात जमा करण्यात आली आहे. सध्या संस्थेकडे १५० कोटी रुपयांच्या ठेवी असून, १०२ कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. तसेच मागील पाच वर्षांपासून संस्थेला 'अ' ऑडिट वर्ग मिळत आहे. या भक्कम आर्थिक कामगिरीमुळे संस्थेवरील सभासदांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. संस्थेच्या प्रगतीशील वाटचालीत आमदार प्रकाशदादा सोळंके व सौ. मंगलाताई सोळंके यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत असून, त्याचबरोबर संचालक मंडळाचे ही सातत्यपूर्ण व मोलाचे मार्गदर्शन संस्थेला मिळत आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे संस्थेने आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि सभासदहिताला प्राधान्य देत उल्लेखनीय प्रगती साधली असून, भविष्यातही संस्थेच्या विकासासाठी हे मार्गदर्शन प्रेरणादायी ठरणार आहे.

संस्थेच्या या यशामागे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुहास सोळंके यांच्यासह सर्व कर्मचारी वर्गाचे नियोजनबद्ध आणि मेहनती योगदान असल्याचे चेअरमन श्री. वीरेंद्र प्रकाश सोळंके यांनी नमूद केले. सभासदांच्या हितासाठी सातत्याने कार्यरत राहून संस्थेची





प्रगती आणखी उंचावण्यासाठी सर्वांनी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक होत असून, मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास सोळंके आणि सर्व कर्मचारी यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. भविष्यातही सभासदांचा विश्वास कायम ठेवत संस्थेची आर्थिक वाटचाल अधिक सक्षम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# जाटनांदूरकरांनी केला भूमिपुत्राचा गुणगौरव

मानूर प्रतिनिधी ह्व

जाटनांदूर ग्रामस्थांनी बीड जिल्हा काँग्रेस कमिटी च्या जिल्हा उपाध्यक्ष पदी अशोक बहिरवाळ यांची निवड झाल्याबद्दल व हरीभाऊ सावंत याची बीड जिल्हा काँग्रेस कमिटी च्या सरचिटणीस पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा गावकऱ्यांच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला अशोक बहिरवाळ हे काँग्रेस पक्षाशी व लोकनेत्या खासदार रजनीताई पाटील, माजी राज्यमंत्री अशोकराव पाटील साहेब यांचे विश्वासू म्हणून त्यांनी कित्येक वर्षे प्रामाणिकपणे काँग्रेस पक्षामध्ये काम केलेले आहे त्यांचा शिरूर तालुक्यामध्ये मोठा जनसंपर्क असून मित्र कंपनी सुद्धा आहे कुठल्याही अभिलाशाला बळी न पडता काँग्रेसच्या पडत्या काळामध्ये काँग्रेसचा झेंडा घेऊन काँग्रेस पक्षाची प्रामाणिकपणे काम सातत्य पूर्व करत राहिले त्याचेच फलित म्हणून काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली त्यांना बीड जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करून त्यांच्या प्रमाणीकपणाचा व निष्ठेचे फलित म्हणून त्यांची निवड करण्यात आली त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे एक प्रामाणिक कार्यकर्त्यांना न्याय मिळाला त्यांच्यावर पक्षाने दिलेली जबाबदारी सार्थपणे पार पाडीन अशा प्रकारची



सत्काराला उत्तर देताना त्यांनी इच्छा व्यक्त केली ते प्रत्येक वेळेस पक्षाने दिलेली जबाबदारी अतिशय प्रामाणिकपणे सांभाळून पक्षाचा व नेत्याचा विश्वास संपादन केला त्यामुळेच आज त्यांना जिल्हा कमिटीवर संधी मिळाली

या वेळी शिरूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष श्री भास्करराव केदार.सेवादलाचे अध्यक्ष श्री रामेश्वर शेळके.जि जिल्हा सरचिटणीस श्री हरिभाऊ सावंत युवक काँग्रेसचे तालुकाप्रमुख श्री महादेव सावंत व जाटनांदूर येथील सरपंच सचिन माने माजी सरपंच हनुमंत डोंगर युवराज घायाळ शिवसेनेचे उप अध्यक्ष शेख गणी, बारीकराव खेंगरे शालेय शिक्षण समिती अध्यक्ष महादेव डोंगर, राजेंद्र डोंगर, प्रदीप जेधे, अर्जुन डोंगर, नारायण जेधे, खदीरभाई, युवराज डोंगर, महादेव डोंगर, गणपत डोंगर, व इतर ग्रामस्थ उपस्थित होते उपस्थितांचे आभार श्री प्रदीप जेधे यांनी मानले

# प्रत्यक्ष यशापेक्षा यशासाठी आवश्यक असणारी गुणवत्ता विद्यार्थ्यांना मिळावी :- डॉ राजेश इंगोले

अंबाजोगाई (प्रतिनिधी ):- प्रत्येक पालकाला, शिक्षकांना आपला विद्यार्थी यशस्वी व्हावा असे वाटते. त्याकरिता ते प्रयत्न देखील करत असतात परंतु यश महत्त्वाचे की यशासाठी आवश्यक असणारी गुणवत्ता महत्त्वाची हा प्रश्न ज्यावेळेस येतो, त्यावेळेस यश मिळवण्यासाठी आवश्यक असणारी गुणवत्ता हीच महत्त्वाची ठरते. हीच गुणवत्ता यशामधील सातत्य टिकवून ठेवते असे महत्त्वपूर्ण वक्तव्य सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ तथा विद्यार्थी समुपदेशक व्याख्याते राजेश इंगोले यांनी न्यू इंग्लिश स्कूल येथे आयोजित आर के ऑनर्स विद्यार्थी शिक्षक व पालक मेळाव्यात केले. संस्थेचे विशेष कार्यकारी संचालक राजेश कराड व विशेष विश्वस्त राहुल कराड यांच्या वाढदिवसानिमित्त हे व्याख्यान सत्र आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी विचार मंचावर उद्घाटक म्हणून गोपाळ बुवा साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक रणवीर कराड व शाळेचे मुख्याध्यापक म मा भस्मे उपस्थित होते.




कार्यक्रमाची सुरुवात स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून तसेच दीप प्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी श्रीमती अश्विनी तोडकर यांनी स्वागत गीत गायले . कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मुख्याध्यापक मा मा भस्मे यांनी या शाळेमध्ये सर्वसामान्य कुटुंबातील मुले शिक्षण घेत आहेत. या सर्वसामान्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांना यशाचा मार्ग दाखवणारी ही संस्था असून याच संस्थेचे अनेक विद्यार्थी हे आज विविध उच्च पदांवर कार्यरत आहेत याचा सार्थ अभिमान असल्याचे प्रा भस्मे यांनी याप्रसंगी सांगितले. संस्थेत चालविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती देखील त्यांनी दिली.

आपले मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त करताना येथील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञबतथा समुपदेशक डॉ राजेश इंगोले यांनी विद्यार्थी हा शिक्षणाचा केंद्रबिंदू असला पाहिजे विद्यार्थ्यांना शिक्षण हे सक्तीचे न वाटता आवडीचे वाटले पाहिजे आणि ही आवड निर्माण करण्याचे काम पालक आणि शिक्षक या दोघांनी करावे अशी अपेक्षा राजेश इंगोले यांनी सांगितले. शिक्षण आणि मन यांचा खूप जवळचा संबंध असल्याने शिक्षक तथा पालकांनी विद्यार्थ्यांच्या मनाची मशागत करणे आवश्यक आहे, अन्यथा यशातील सातत्य टिकून राहणे अवघड जाते.

डॉ इंगोले यांनी प्रत्यक्ष वस्तूस्थितीमध्ये पालकांच्या मनोवृत्तीच्या विविध प्रकाराची विवंचना करतांना पालकांच्या विविध मनोवृत्ती मुळे मुलांची मनाची अवस्था ही अवघडल्यासारखी होते. त्यामुळे पालकांनी आपली मते मुलांवर लादण्यापेक्षा संतुलित पालक बनणे अधिक गरजेचे असते असा मौलिक सल्ला उपस्थित पालकांना दिला. विद्यार्थ्यांनी आयुष्यामध्ये काय बनावे यापेक्षा विद्यार्थ्यांवर शिक्षक व पालकांनी मानवी मूल्य व संस्कार देण्याचा प्रयत्न करून सर्वप्रथम त्यांना माणूस म्हणून घडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे असेही नमूद केले.समाजात सुसंस्कारित नैतिक अधिष्ठान असलेली पिढी, नैतिक अधिष्ठान असलेला समाज घडवत असते आणि असा नैतिक समाज नैतिक राष्ट्राची उभारणी करत असतो त्यामुळे संस्कार व मानवी मूल्य ही विद्यार्थ्यांसाठी अत्यावश्यक असल्याचे डॉ राजेश इंगोले यांनी यावेळी स्पष्ट केले.

मुलांच्या अभ्यास विषयक समस्या, वर्तन विषयक समस्या याविषयी अत्यंत सोप्या मार्मिक भाषेत शिक्षक व पालकांचे समुपदेशन केले. प्रत्येक पालकांनी आपला गुणवत्ता पूर्ण वेळ आपल्या पाल्यांसोबत व्यतीत केला पाहिजे. त्यांच्यासोबत विश्वासाचे, प्रेमाचे नाते निर्माण केले पाहिजे. मुलांना निर्णय व मत मांडण्यासाठी प्रव्रत केले पाहिजे. स्वतःचे मत व निर्णय प्रक्रिया घेऊ शकणारी पिढीच आपल्या ध्येयाच्या दिशेने सातत्यपूर्ण प्रवास करू शकते. निर्णय घेण्याच्या स्वातंत्र्यामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन त्या मुलांमध्ये नैसर्गिकरीत्या नेतृत्व गुण विकसित होतात हीच बाब व्यक्तिमत्व विकासाचा मैलाचा दगड ठरू शकते असे मत डॉ राजेश इंगोले यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती अनुजा पवार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी न्यू इंग्लिश स्कूलच्या सर्व शिक्षक वृंद आणि कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले

# राखी बांधून भगिनींनी दिला स्नेहाचा बंध;माजी आ.भीमराव धोंडेंनी दिला आरोग्याचा संदेश



बाबाजी महाविद्यालय परिसरात राखी पौर्णिमेचे औचित्य;नियमित व्यायाम,पायी फिरणे व सकस आहाराचा नागरिकांना सल्ला

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा येथील परिसरात राखी पौर्णिमेनिमित्त स्नेहपूर्ण वातावरण पाहायला मिळाले. दररोज सकाळी पायी फिरण्यासाठी व व्यायामासाठी महाविद्यालय परिसरात येणारे माजी आ. भीमराव धोंडे यांना महाविद्यालयातील विद्यार्थिनी व उपस्थित महिलांनी राखी बांधून रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या. भगिनींनी व्यक्त केलेला हा स्नेह स्वीकारल्यानंतर माजी आ. भीमराव धोंडे यांनी उपस्थित विद्यार्थी, महिला व नागरिकांशी संवाद साधत निरोगी जीवनशैलीचा संदेश दिला.

माजी आ. भीमराव धोंडे हे आपल्या दैनंदिन दिनचर्येत नियमित व्यायाम व पायी फिरण्याला विशेष महत्त्व देतात. त्यानुसार राखी पौर्णिमेच्या दिवशीही त्यांनी नेहमीप्रमाणे कडा येथील आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालयाच्या परिसरात फेरफटका मारून व्यायाम केला. व्यायाम झाल्यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थिनी व उपस्थित महिलांनी त्यांना राखी बांधण्याचा आग्रह केला. धोंडे यांनी हा स्नेह आनंदाने स्वीकारत सर्व भगिनींना राखी पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.

या स्नेहपूर्ण प्रसंगाचे औचित्य साधून माजी आ. भीमराव धोंडे यांनी उपस्थित नागरिकांना आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन केले. बदलती जीवनशैली, वाढता मानसिक ताण, दैनंदिन धावपळ आणि कामाच्या व्यापामुळे अनेकांकडून आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात नियमित व्यायाम, पायी चालणे, योगासने तसेच सकस व संतुलित आहाराला महत्त्व द्यावे, असे त्यांनी सांगितले.

आरोग्य चांगले ठेवण्यासाठी महागडी साधने किंवा मोठ्या खर्चाची आवश्यकता नसते. नियमित चालणे, व्यायाम करणे आणि योग्य व सकस आहार घेणे या साध्या सवयी अंगीकारल्यासही निरोगी जीवन जगता येते, असा आरोग्यविषयक संदेश माजी आ. भीमराव धोंडे यांनी दिला. विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासाकडे लक्ष न देता आपल्या शारीरिक व मानसिक आरोग्याचीही काळजी घ्यावी. शिक्षणासोबतच व्यायाम, खेळ आणि शिस्तबद्ध जीवनशैली अंगीकारणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राखी पौर्णिमेनिमित्त विद्यार्थिनी व महिलांनी माजी आ. भीमराव धोंडे यांना राखी बांधून व्यक्त केलेला स्नेह आणि त्यानंतर धोंडे यांनी दिलेला आरोग्याचा संदेश यामुळे बाबाजी महाविद्यालय परिसरातील हा प्रसंग विशेष ठरला. रक्षाबंधनाच्या सणातून निर्माण होणारा स्नेहबंध आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश यांचा सुंदर संगम या वेळी पाहायला मिळाला.



# वंचित भगिनींसोबत आ.सुरेश धस यांचा रक्षाबंधन सोहळा

राखीच्या धाग्यातून जपला माणुसकीचा स्नेहबंध

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) रक्षाबंधनाच्या पवित्र पर्वानिमित्त आष्टी विधानसभा मतदारसंघाचे भाजप आमदार सुरेश आण्णा धस यांच्या अद्वैतचंद्र निवासस्थानी यंदाही रक्षाबंधनाचा सण प्रेम, आपुलकी आणि स्नेहाच्या वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला. गोरगरीब, वंचित तसेच भटक्या-विमुक्त समाजातील असंख्य भगिनींनी आमदार सुरेश धस यांच्या मनगटावर राखी बांधून बंधुभावाची भावना व्यक्त केली.

सालाबादप्रमाणे यंदाही विविध समाजघटकांतील भगिनी मोठ्या संख्येने रक्षाबंधनासाठी अद्वैतचंद्र निवासस्थानी दाखल झाल्या. भगिनींनी आमदार सुरेश धस यांच्या मनगटावर प्रेमाचा आणि विश्वासाचा राखीचा धागा बांधत त्यांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी आमदार धस यांनीही भगिनींच्या प्रेमाचा आणि जिव्हाळ्याचा सन्मान करत प्रत्येक भगिनीला साडी-चोळी व फळे देऊन आदरपूर्वक सन्मानित केले.

रक्षाबंधनाच्या या सोहळ्यात केवळ भाऊ-बहिणीच्या नात्याचे औपचारिक दर्शन झाले नाही, तर समाजातील गोरगरीब, वंचित आणि भटक्या-विमुक्त घटकांशी असलेला आपुलकीचा, माणुसकीचा आणि सामाजिक बांधिलकीचा स्नेहबंध अधिक दृढ करण्याचा संदेश देण्यात आला. भगिनींच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद, समाधान आणि आपलेपणाची भावना ही या सोहळ्याची विशेष आकर्षण ठरली.

यावेळी बोलताना आमदार सुरेश आण्णा धस म्हणाले, रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीच्या नात्याचा सण नाही, तर प्रेम, विश्वास, आपुलकी आणि सामाजिक बांधिलकी जपणारा पवित्र सण आहे. माझ्या सर्व भगिनींचे प्रेम आणि आशीर्वाद हीच माझी खरी ताकद आहे. राखीच्या या पवित्र धाग्याने जपलेला स्नेहबंध सदैव दृढ राहावा आणि प्रत्येक भगिनीच्या आयुष्यात सुख, समाधान, आनंद व समृद्धी नांदावी, हीच मनापासून सदिच्छा आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

आमदार सुरेश धस यांच्या अद्वैतचंद्र निवासस्थानी झालेल्या या रक्षाबंधन सोहळ्यामुळे सामाजिक समतेचा आणि बंधुभावाचा संदेश अधोरेखित झाला. समाजातील प्रत्येक घटकाला आपलेपणाची व सन्मानाची वागणूक मिळावी, या भावनेतून साजरा झालेल्या या उपक्रमाचे उपस्थित भगिनींनी कौतुक केले.

रक्षाबंधनाच्या निमित्ताने राखीच्या धाग्याबरोबरच माणुसकी, प्रेम, विश्वास आणि आपुलकीचा बंध अधिक घट्ट करण्याचा अनोखा प्रयत्न यंदाही करण्यात आला. अद्वैतचंद्र निवासस्थानी दिवसभर आनंदाचे आणि भावनिक वातावरण पाहायला मिळाले. आ. सुरेश धस यांनी उपस्थित सर्व भगिनींना रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा देत त्यांच्या सुखी, समाधानी आणि समृद्ध आयुष्यासाठी मनःपूर्वक सदिच्छा व्यक्त केल्या.

# मागण्या मान्य न झाल्यास लाखोंच्या ताफ्यासह मुंबईकडे कूच करू

## मनोज जरांगे पाटील यांचा सरकारला इशारा

वडीगोद्री (जि. जालना), दि. २८ ऑगस्ट : मराठा आरक्षणाच्या मागण्यांच्या अंमलबजावणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. सरकारने मागण्या वेळेत पूर्ण केल्या नाहीत, तर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल आणि त्यानंतर लाखोंच्या संख्येने वाहनांच्या ताफ्यासह मुंबईकडे कूच करू, असा इशारा जरांगे पाटील यांनी शुक्रवारी (दि. २८) पत्रकार परिषदेत दिला.

अंतरवाली सराटी येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, आंदोलनातील मागण्यांबाबत सरकारने ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. मागण्या पूर्ण करण्यासाठी आपण कोणत्याही परिस्थितीला सामोरे जाण्यास तयार असून, सरकारने वेळकाढूपणा केल्यास आंदोलनाला वेगळे वळण मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी प्रशासनातील काही अधिकाऱ्यांकडून अर्ज स्वीकारण्यास टाळाटाळ होत असल्याचा आरोप केला. वरिष्ठ स्तरावर अर्ज पोहोचत नसल्याने संबंधित समाजाची दिशाभूल होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. ज्यांना नामनिर्देशन मिळाले आहे, मात्र प्रवेश मिळालेला नाही, त्यांनी थेट संबंधित न्यायालयात अर्ज सादर करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

जिल्हाधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी (एसडीएम) तसेच जात पडताळणी समितीच्या अधिकाऱ्यांनी संबंधित प्रकरणांची दखल घेऊन कार्यवाही करावी. प्रमाणपत्र देण्यास अडचण असल्यास शासनाने त्याचा स्पष्टपणे विचार करून निर्णयाची अंमलबजावणी करावी, अशी मागणीही जरांगे पाटील यांनी केली.

आता आझाद मैदान नाही, थेट 'वर्षा'वर बसणार

शासनाकडून चर्चेसाठी संपर्क झाल्याचा दावा करत जरांगे म्हणाले, मला सरकारकडून फोन आले होते; मात्र मला केवळ पोकळ आश्वासने नको, प्रत्यक्ष अंमलबजावणी हवी आहे. यावेळी आंदोलन करण्यासाठी आम्ही आझाद मैदानात जाणार नाही, तर थेट मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' निवासस्थानावर जाऊन ठाण मांडणार. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मराठा उपसमितीवर टीका करताना त्यांनी उपसमितीच्या सुस्त कामकाजावर नाराजी व्यक्त केली, तसेच महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या दाव्यांचाही समाचार घेतला.

एकाही मराठ्याने आत्महत्या करू नये

समाजातील तरुणांना अत्यंत भावनिक आवाहन करताना जरांगे पाटील म्हणाले, राज्यातील कोणत्याही मराठा तरुणाने टोकाचे पाऊल उचलून आत्महत्या करू नये. तुमच्या हक्कासाठी मी तुमचा बाप म्हणून इथे बसलेलो आहे. प्रमाणपत्र कसे मिळत नाही, ते मी बघून घेतो. समाजाने मरगळ झटकून घरात न बसता आंदोलनासाठी सज्ज राहावे.

### जालना पोलिसांच्या सुट्ट्या रद्द

मनोज जरांगे यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्हा पोलीस दलाने सतर्कतेचा इशारा जारी केला आहे. २९ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या वैद्यकीय रजा वगळता इतर सर्व सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अंतरवाली सराटी परिसरात ४०० पोलीस कर्मचारी, ४ उपविभागीय पोलीस अधिकारी, ११ पोलीस निरीक्षक, २ एसआरपीएफ कंपन्या आणि ३ आरसीपी प्लाटून असा तगडा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.



### मनोज जरांगे पाटील यांच्या प्रमुख मागण्या:

- ५८ लाख कुणबी नोंदींना तात्काळ जात प्रमाणपत्र व जात वैधता देणे.
- सातारा, कोल्हापूर, औंध आणि पुणे गॅझेटचा अधिकृत शासकीय आदेश काढणे.
- आरक्षण लढ्यात बलिदान गेलेल्या आंदोलकांच्या कुटुंबातील पात्र वारसांना शासकीय नोकऱ्या देणे.
  स्वतंत्र मराठा-कुणबी मंत्रालयाची स्थापना करणे.
  'सारथी' संस्थेच्या बंद करण्यात आलेल्या सर्व कल्याणकारी योजना पूर्ववत सुरू करणे.
- अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या थकीत व्याज परताव्याचा प्रश्न निकाली काढणे.
- मराठवाड्यात रद्द करण्यात आलेली चार जात प्रमाणपत्रे पुन्हा वैध ठरवणे.

# नेपाळमध्ये पुन्हा महापुराची भीती!


काठमांडू : मध्य नेपाळमध्ये आलेल्या प्रलयकारी पुरामुळे (फ्लॅश फ्लड) निर्माण झालेली परिस्थिती शुक्रवारी अधिकच बिकट झाली. या पुराच्या तडाख्यातील मृतांची संख्या वाढून तब्बल ५४७ वर पोहोचली आहे. शोध आणि बचाव मोहीम सुरू असतानाच अधिक मृतदेह हाती येत आहेत.

भोटेकोशी नदीच्या पाण्याच्या पातळीत पुन्हा वाढ झाल्याने नव्याने पुराचा धोका निर्माण झाला असून प्रशासनाकडून अत्यंत खबरदारीने बचावकार्य राबवले जात आहे. नेपाळ-तिबेट सीमेवर आलेल्या भीषण महापुरामळे आणि ढगफुटीमुळे हाहाकार उडाला असून या दुर्घटनेत किमान ३२० भारतीय नागरिक अद्यापही बेपत्ता आहेत तर चीनच्या (तिबेट) हद्दीत सुमारे ४०० भारतीय अडकले आहेत.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ५० ई-बसेसचे लोकार्पण, कुंभमेळ्यावर आधारित छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन

नाशिक : नाशिक शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम, आधुनिक, पर्यावरणपूरक आणि नागरिकाभिमुख करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पीएम ई-बस सेवा योजनेंतर्गत ५० ई-बसेसचे नाशिककरांच्या सेवेत दाखल होत आहेत. या बसेसच्या माध्यमातून नागरिकांना विश्वासार्ह व दर्जेदार प्रवासाची सुविधा मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. नाशिक शहरासाठी दाखल झालेल्या ५० ई-बसेसचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी पालकमंत्री गिरीष महाजन, महानगरपालिकेच्या महापौर हिमगौरी आहेर-आडके, उपमहापौर विलास शिंदे, महानगरपालिका आयुक्त मनिषा खत्री, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

केंद्र शासनाच्या पीएम ई-बस सेवा योजनेंतर्गत नाशिक शहरासाठी मंजूर करण्यात आलेल्या १२ मीटर लांबीच्या ५० ई-बसेस शहरात दाखल झाल्या आहेत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत आधुनिक ई-बसेसचा समावेश झाल्यामुळे नागरिकांना विश्वासार्ह व दर्जेदार प्रवासाची सुविधा मिळणार आहे. तसेच सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढल्यास खासगी वाहनांवरील अवलंबित्व कमी होऊन शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासही हातभार लागणार आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. डिझेल बसेसच्या तुलनेत ई-बसेसच्या वापरामुळे परिचालन खर्चातही बचत होणार आहे. नाशिक शहराचा विकास आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी भविष्यात आणखी बसेस उपलब्ध होणार असून त्यातून नागरिकांना अधिक व्यापक आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.



# बीड शहराचा रुहानी सुकून; हजरत मन्सूरशाह वली (र.ह.) यांच्या उर्सानिमित्त संदल व चादर अर्पण

बीड / प्रतिनिधी

शहरातील प्रसिद्ध हजरत मन्सूरशाह वली (र.ह.) यांच्या सालाना उर्साच्या मुबारक प्रसंगी दरवर्षीप्रमाणे यंदाही केजीएन ग्रुपच्या वतीने श्रद्धा व भक्तिभावाने संदल व चादर अर्पण करण्यात आली.

केजीएन ग्रुपच्या वतीने संस्थापक अध्यक्षांच्या नियोजनानुसार सय्यद जहीर अली शाह कादरी यांच्या हस्ते संदल काढण्यात आला आणि चादर शरीफ अर्पण करण्यात आली. यावेळी अरशद अहमद ख़ान सज्जादा, ग्वालियर यांची विशेष उपस्थिती लाभली. केजीएन ग्रुपच्या वतीने अर्पण करण्यात येणारी चादर चढविण्यासाठी ग्वालियरहून विशेष उपस्थित राहिल्याने या उर्साचे धार्मिक महत्त्व अधिक अधोरेखित झाले.

या पवित्र प्रसंगी समीर काझी, अकबर खान यांच्यासह केजीएन ग्रुपचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच बीड शहरासह बीड जिल्ह्यातील विविध भागांतून आलेल्या नागरिकांनी संदल व चादर अर्पण कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

सर्वधर्मीय ऐक्य, भाईचारा आणि आध्यात्मिक शांततेचा संदेश देणाऱ्या या उर्सानिमित्त बीड शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. हजरत मन्सूरशाह वली (र.ह.) यांच्या दर्ग्याच्या परिसरात उपस्थित भाविकांनी श्रद्धेने दर्शन घेतले आणि शहराच्या सुख-शांतीसाठी दुआ मागितली.

ग्वालियरहून अरशद अहमद ख़ान सज्जादा यांची विशेष उपस्थिती आणि केजीएन ग्रुपच्या वतीने अर्पण



करण्यात आलेली चादर हा यंदाच्या उर्सातील विशेष आकर्षण ठरला.

## मतदार यादीतून नाव वगळले असल्यास

# ३० सप्टेंबरपर्यंत पुन्हा नाव नोंदणीची संधी

मुंबई : भारत निवडणूक आयोगाने मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाच्या (एसआयआर) अनुषंगाने प्रसिद्ध केलेल्या सुधारित वेळापत्रकानुसार ३१ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जाणार आहेत.

त्यानंतर ३० सप्टेंबरपर्यंत या मतदार यादीवर हरकती-सूचना देता येणार आहेत. ज्या मतदारांची नावे प्रारुप मतदार यादीत समाविष्ट नाहीत वा मतदार यादीतून वगळली गेली आहेत त्यांना ३० सप्टेंबरपर्यंत पुन्हा नाव नोंदणीची संधी



मिळणार आहे.भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार, मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यात मतदार यादीसाठी विशेष सखोल पुनरिक्षण (स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन अर्थात एसआयआर) कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाचे वेळापत्रक नुकतेच आयोगाने जाहीर केले. त्यानुसार, मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांतर्गत सर्व विधानसभा मतदार संघातील मतदान केंद्रांच्या सुसुत्रीकरणाच्या प्रस्तावास भारत निवडणूक आयोगाने २४ ऑगस्ट २०२६ रोजी मान्यता दिली. तसेच ३१ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जाणार आहेत.



# छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेड च्या वतीने
## मार्कंडेय रथयात्रेच पुष्पवृष्टी करून स्वागत

सोलापूर- पद्मशाली समाजाच कुलदैवत मार्कंडेय रथयात्रेच विजापूर वेस येथे आगमन झाल्यावर रथावर मुस्लिम मावळयांकडून पुष्पवृष्टी करण्यात आली. प्रतिवर्षा प्रमाणे यंदा ही मराठा सेवा संघ संचलित छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेड च्या वतीने रक्षाबंधन निमित्त निघणाऱ्या मार्कंडेय रथयात्रेच विजापूर वेस येथे आगमन झाल्यावर ज्ञाती संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच पुष्पहार अर्पण करून माजी महापौर अरिफ शेख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आल. तसेच पालखीस जेल रोड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील यांच्या हस्ते पुजन करण्यात आले. मुख्य रथास राम गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून मुस्लिम मावळयांकडून पुष्पवृष्टी करण्यात आल. या वैविध्यपूर्ण कार्यक्रमाच आयोजन मुस्लिम ब्रिगेडच शहराध्यक्ष हाजी मतीन बागवान जिल्हाध्यक्ष म शफीक रचभरे हारुण शेख बशीर सय्यद भाऊसाहेब नरखेडकर राजू हुंडेकरी तन्वीर गुलजार रिजवान शेख रियाज पैलवान मोहसीन शेख शेरु उस्ताद रिजवान दंडोती लक्ष्मण भोसले बाळासाहेब भोसले इरफान बागवान आदी उपस्थित होते

# मुलांनी मोफत शैक्षणिक साहित्याचा वापर
## गुणवत्तेसाठी करावा -प्रणिता गंगाखेडकर

बीड... दिनांक २७/८/२०२६

बीड जिल्हा व शहरातील अनेक गोरगरीब,होतकरू, हुशार विद्यार्थ्यांना प्रयास फाउंडेशन मुंबई व गुरुआनंद महिला प्रतिष्ठान बीड ने शैक्षणिक साहित्य रजिस्टर, वही, पेन, पेन्सिल, पाटी हे साहित्य मोफत वाटप करते त्यांचा विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवंत्ता वाढविण्यासाठी वापर करावा असे आवाहन बीड च्या नूतन गटशिक्षणधिकारी सौं प्रणिता गंगाखेडकर यांनी उपस्थित पालक, शिक्षक, विद्यार्थी यांना




उद्देशून केले.

आज आझाद हिंद सेमी इंग्लिश उर्दू स्कूल काजीं नगर बीड येथे तीनशे मुलांना मोफत शैक्षणिक साहित्य प्रणिता गंगाखेडकर यांच्या शुभस्ते व आयोजक सीमा ओस्तवाल, केंद्र प्रमुख अजीजपुरा शेख सलमा रशीद,शाळेच्या अध्येक्षा शेख अनिसा बेगम यांच्या प्रमुख उपस्थितीत वाटप करण्यात आले.सीमा ओस्तवाल यांनी सांगितले की मुलांनी वर्गात शिक्षणा बरोबर खेळत खूप हुशार चंचल बनावे शाळेच्या बरोबर आई-वडिलांचे नाव कमवावे. सुरवातीला मान्यवरचे येथोचित सत्कार शाळे तर्फे करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे संचालन सबा बाजी, प्रस्ताविक यास्मिन बाजी, आभार तरन्नूम बाजी तर नियोजन साईमा व हुमेरा बाजी यांनी केले. तसेच साहित्य वाटपास मदत सिद्दीकी बशीर,सय्यद अवेजअली, शेख मुद्दशिर, शेख अय्याज, शेख रज्जाक, शेख फैसल यांनी केली. साहित्य मिळाल्याबदल मुलांचे चेहरे आनंदित झाल्याचे दिसून आले.

# मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर
## सतीश कांबळे यांची शिक्षकपदी निवड
### गावच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी केला सत्कार

माजलगाव, प्रतिनिधी : शहरापासून जवळच असलेल्या ब्रह्मगावचे सुपुत्र सतीश महादू कांबळे यांची सोलापूर जिल्हा परिषद येथे प्राथमिक शिक्षकपदी निवड झाली आहे. प्रतिकूल परिस्थितीत मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल ब्रह्मगाव ग्रामस्थांनी त्यांचा सत्कार करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सतीश कांबळे यांनी आपल्या शैक्षणिक प्रवासात सातत्यपूर्ण प्रयत्न करत शिक्षक होण्याचे ध्येय साध्य केले. स्पर्धात्मक प्रक्रियेत यश मिळवत त्यांनी प्राथमिक शिक्षकपदाला गवसणी घातली. त्यांच्या या यशामुळे कुटुंबीय, मित्रपरिवार तसेच ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर यशाचे नवे शिखर गाठणाऱ्या सतीश कांबळे यांचे विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, मित्रपरिवार व ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांच्या यशामुळे ब्रह्मगावच्या



शैक्षणिक क्षेत्रातही अभिमानाची भर पडली आहे. यशाबद्दल त्यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी भाजप नेते नितीन नाईकनवरे, ऊसतोड कामगार सा. प्रा. अध्यक्ष अनिल राधे कांबळे, माजी नगरसेवक शिवाजी सुतार, पोलीस पाटील मधु कांबळे, ब्रह्मगावचे सरपंच नारायण भले, उपसरपंच गंगाराम शेंडगे, सदस्य हनुमान सरवदे, मुख्याध्यापक गवळी सर, सुधाकर कांबळे, रमेश जाधव,थोरात महाराज, बंडू लोखंडे, कचरू कांबळे, किरण थोरात,अशोक थोरात, विलास लोखंडे, सचिन गायकवाड, किरण कांबळे, हरिभाऊ शिरसागर, अजय अवघडे, मनोज कांबळे, बालाजी कांबळे, किरण कांबळे, विक्रांत कांबळे, शहादेव कांबळे, मच्छिंद्र कांबळे, दिगंबर कांबळे, सौरभ कांबळे व सर्व गावकरी उपस्थित होते.

# जुगार अड्ड्यावर ग्रामीण पोलिसांचा छापा; लाखोंचा मुद्देमाल जप्त

परळी / प्रतिनिधी

शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये गुपचूप सुरू असलेल्या 'तिरट' जुगाराच्या अड्ड्यावर परळी ग्रामीण पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत जुगार खेळणाऱ्या १८ जणांसह जुगार चालविणारा आणि जुगारासाठी जागा उपलब्ध करून देणाऱ्या अशा एकूण २० जणांवर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी रोख रक्कम, विविध कंपन्यांचे मोबाईल, दुचाकी व चारचाकी वाहने असा एकूण ३७लाख ३४ हजार २७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

परळी-अंबाजोगाई रस्त्यालगत कन्हेरवाडी शिवारातील शेतातील एका पत्र्याच्या शेडमध्ये 'तिरट' जुगार सुरू असल्याची माहिती परळी ग्रामीण पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार २७ ऑगस्ट रोजी दुपारी सुमारे ३.४० वाजता पोलिसांनी तेथे छापा टाकला. यावेळी काही जण पत्त्यांवर पैसे लावून जुगार खेळत असल्याचे, तर काही जणांकडून जुगार खेळविला जात असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

रोख रक्कमेसह वाहने, महागडे मोबाईल जप्त

पोलिसांनी केलेल्या कारवाईत रोख रकमेसह विवो, सॅमसंग, ओपो, आयफोन यांसह विविध कंपन्यांचे मोबाईल, हिरो स्प्लेंडर, होंडा शाईन, हिरो पेंशन प्रो यांसारख्या दुचाकी तसेच महिंद्रा स्कॉर्पिओ आणि टाटा पंच यांसारखी चारचाकी वाहने जप्त केली. पोलिसांच्या माहितीनुसार, जप्त करण्यात आलेल्या सर्व मुद्देमालाची एकत्रित किंमत ३७ लाख ३४ हजार २७० रुपये आहे.

महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा

या कारवाईचा पंचनामा परळी ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मल्हार शिवरकर यांनी दोन पंचांसमक्ष केला. जप्त मुद्देमाल तपासकामी पोलिसांच्या ताब्यात घेण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक अंकुश ज्ञानेश्वर निमोणे यांच्या फिर्यादीवरून परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४०६/२०२६, महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ४ व ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल करण्याची कारवाई पोलीस अंमलदार क्षीरसागर यांनी केली असून, पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक पागोटे करीत आहेत. पोलीस निरीक्षक मल्हार शिवरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कारवाईमुळे ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बेकायदा जुगार अड्डे चालविणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांच्या निर्देशानुसार विशेष उपक्रम; शिवाजीनगर,
## चकलंबा, गेवराई व माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यांची उल्लेखनीय कामगिरी
### रक्षाबंधनाची अनोखी भेट; बीड पोलिसांकडून चोरीस गेलेले दागिने व मौल्यवान मुद्देमाल नागरिकांना परत.

बीड (प्रतिनिधी):-रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांची हक्काची व कष्टाची मालमत्ता त्यांना परत मिळावी तसेच पोलीस व नागरिकांमधील विश्वासाचे नाते अधिक दृढ व्हावे, या उद्देशाने पोलीस अधीक्षक, बीड श्री. नवनीत कॉवत यांनी जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना त्यांच्या पोलीस ठाण्यांमध्ये उपलब्ध असलेला चोरीस गेलेला व तपासादरम्यान हस्तगत झालेला किमती मुद्देमाल तपासून, आवश्यक त्या सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून रक्षाबंधनाच्या निमित्ताने संबंधित मालकांना परत करण्याचे निर्देश दिले होते.

पोलीस अधीक्षक यांच्या या नागरिककेंद्री व संवेदनशील उपक्रमाच्या अनुषंगाने शिवाजीनगर, चकलंबा, गेवराई व माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यांनी विविध गुन्ह्यांमध्ये हस्तगत केलेला मौल्यवान मुद्देमाल तसेच शोधून काढलेले हरविलेले मोबाईल फोन आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मूळ मालकांच्या स्वाधीन केले. रक्षाबंधनाच्या निमित्ताने नागरिकांना त्यांच्या मौल्यवान वस्तू परत मिळणे ही बीड पोलिसांकडून नागरिकांना दिलेली एक अनोखी भेट ठरली आहे.

शिवाजीनगर पोलीस ठाणे-चोरीस गेलेले सोन्याचे दागिने महिलांना परत

शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या पथकाने चोरीच्या घटनांचा तत्परतेने तपास करून हस्तगत केलेला सोन्या-चांदीचा मुद्देमाल कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून संबंधित महिलांना परत केला. राजीव गांधी चौक, बीड येथील राहत्या घरातून सोन्या-चांदीचे दागिने चोरीस गेल्याच्या गुन्ह्याचा सखोल तपास करून पोलिसांनी ३,३७,२८०/- किमतीचे



सोन्या-चांदीचे दागिने तपासा दरम्यान हस्तगत केलेले. तसेच परळी येथील महिला बीड बसस्थानक येथे बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन चोरीस गेलेले २८,९८५/- किमतीचे सोन्याचे मिनी गंठण तत्पर कारवाई करून आरोपीस अटक करत हस्तगत करण्यात आलेले होते.

सर्व आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांच्या हस्ते दोन्ही महिलांना त्यांचा मुद्देमाल परत करण्यात आला. रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला कष्टाने मिळवलेले दागिने पुन्हा मिळाल्याने दोन्ही महिलांनी समाधान व्यक्त करत बीड पोलिसांचे आभार मानले.

चकलंबा पोलीस ठाणे

२.५५ लाखांचे सोन्याचे दागिने परत

चकलंबा पोलीस ठाणे गु.र.नं. २५६ / २०२६ मधील तपासादरम्यान जप्त करण्यात आलेले २,५५,०००/- किमतीचे सोन्याचे दागिने सर्व आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून रक्षाबंधनाच्या निमित्ताने संबंधित तक्रारदारास परत करण्यात आले.

गेवराई पोलीस ठाणे-मुद्देमाल आणि १० हरविलेले मोबाईल मूळ मालकांना परत

गेवराई पोलीस ठाण्याने रक्षाबंधनाच्या दिवशी विशेष कामगिरी बजावत एकूण चार मौल्यवान जप्त मुद्देमाल मूळ मालकांना परत केले. यासोबतच पोलिसांनी नागरिकांचे एकूण १० हरविलेले मोबाईल फोन शोधून काढून तेही त्यांच्या मूळ मालकांच्या स्वाधीन केले. हरविलेल्या वस्तू परत मिळाल्याने संबंधित नागरिकांनी बीड पोलिसांचे आभार मानले.

माजलगाव ग्रामीण पोलीस ठाणे न्यायालयाच्या आदेशानंतर ३२ हजारांचा मुद्देमाल परत

माजलगाव ग्रामीण पोलीस ठाणे गु.र.नं. १५३/२०२६, कलम ३३१(४), ३०५ (-) इछड अन्वये दाखल गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला ३२,०००/- किमतीचा मौल्यवान मुद्देमाल मा. न्यायालयाच्या आदेशानुसार तक्रारदारास परत करण्यात आला.

रक्षाबंधनाच्या निमित्ताने राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून नागरिकांच्या हक्काची मालमत्ता त्यांना परत मिळवून देण्यासाठी बीड पोलीस कटिबद्ध आहेत, हा विश्वास अधिक दृढ झाला आहे. चोरीस गेलेल्या अथवा हरविलेल्या मालमत्तेचा शोध घेऊन, आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ती मूळ मालकांना परत मिळवून देण्यासाठी बीड जिल्हा पोलीस सातत्याने प्रयत्नशील आहेत.

पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांच्या संवेदनशील आणि नागरिककेंद्री नेतृत्वाखाली राबविण्यात आलेला हा उपक्रम पोलीस व नागरिकांमधील विश्वासाचे नाते अधिक दृढ करणारा ठरला आहे. रक्षाबंधनाच्या पवित्र सणानिमित्त नागरिकांना त्यांच्या कष्टाची आणि हक्काची मौल्यवान मालमत्ता परत मिळवून देत बीड पोलिसांनी रक्षाबंधनाची अनोखी भेट दिली आहे.



# जायंट्स ग्रुपतर्फे 'पर्यावरण रक्षाबंधन' उपक्रम
## झाडांना राखी बांधून दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश

खुलताबाद/ प्रतिनिधी

भाऊ-बहिणीच्या प्रेमाचे प्रतीक असलेल्या रक्षाबंधन सणाला पर्यावरण संवर्धनाची सुंदर जोड देत जायंट्स ग्रुप ऑफ खुलताबाद यांच्या वतीने यंदाही अभिनव 'पर्यावरण रक्षाबंधन' उपक्रम राबविण्यात आला.

रक्षाबंधनाच्या निमित्ताने पंचायत समितीच्या आवारातील विविध झाडांना पर्यावरणपूरक राख्या बांधून झाडांचे संरक्षण व संवर्धन करण्याचा संदेश देण्यात आला. झाडे आहेत म्हणूनच जीवन आहे; झाडांचे रक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे हा संदेश या उपक्रमातून नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला.

यावेळी जायंट्स ग्रुप ऑफ खुलताबादचे अध्यक्ष सतीश कोळी, फेडरेशन ऑफिसर दिनेश सावजी,माजी अध्यक्ष संदेश केरे,कोषाध्यक्ष राम सोलाट,शिवाजी घोडके तसेच ग्रुपचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

राखी फक्त मनगटावरच नव्हे,
तर झाडांनाही बांधूया
कारण झाडे जगली, तरच
आपले उद्याचे जीवन सुरक्षित
राहील!

या उपक्रमातून वृक्षसंवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि निसर्गाप्रती असलेली सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात आला.

# पोकळे वस्तीवरील जि.प. शाळा जीर्णावस्थेत;
## विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर



छताचे खपले कोसळत असल्याने विद्यार्थी-शिक्षक जीव मुठीत घेऊन ज्ञानार्जन; स्ट्रक्चर ऑडिट करून पुनर्बांधणीसाठी निधी द्या :- डॉ. गणेश ढवळे

आष्टी : (दि. २८) आष्टी तालुक्यातील पिंपळा केंद्रांतर्गत लोणी सय्यदमिर येथील पोकळे वस्तीवरील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची इमारत जीर्णावस्थेत असून छताचे खपले कोसळून विद्यार्थ्यांच्या अंगावर पडत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. त्यामुळे शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, जीव मुठीत घेऊन ज्ञानार्जन करण्याची वेळ विद्यार्थ्यांवर आली आहे.

या शाळेचे तातडीने 'स्ट्रक्चर ऑडिट' करून धोकादायक इमारतीची पुनर्बांधणी करण्यात यावी तसेच नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी जिल्हा वार्षिक नियोजन निधीतून आवश्यक तरतूद करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य, डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रेहमान यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

'स्कूल ठीक करो' अभियानातील पाहणीवर प्रश्नचिन्ह

'स्कूल ठीक करो' अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यातील शाळांच्या दुरावस्थेची पाहणी करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करणारे आष्टीचे गटशिक्षणाधिकारी आणि शाळांच्या पाहणीसाठी परवानगी घेण्याच्या सूचना देणारे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रेहमान आता या धोकादायक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी काय पाऊल उचलणार? नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देणार का? असा सवाल डॉ. गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

१९९८ साली बांधलेली इमारत जीर्ण

लोणी सय्यदमिर येथील पोकळे वस्तीवरील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पहिली ते चौथीपर्यंतचे वर्ग असून एकूण २६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळेची इमारत सन १९९८ मध्ये षटकोनी आकारात बांधण्यात आली होती.मात्र, सध्या इमारतीची अवस्था अत्यंत खराब झाली असून छताचे खपले कोसळत आहेत.शाळेच्या इमारतीच्या दुरवस्थेबाबत दरवर्षी वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देऊन पाठपुरावा करण्यात येत असल्याचे शाळेचे मुख्याध्यापक दत्ता मामा शिंदे यांनी डॉ. गणेश ढवळे यांच्याशी बोलताना सांगितले.

विद्यार्थ्यांच्या जीविताशी खेळ नको

जीर्ण इमारतीत विद्यार्थ्यांना बसवून शिक्षण देणे धोकादायक ठरू शकते. एखादी दुर्घटना घडल्यानंतर प्रशासन जागे होण्यापेक्षा तातडीने स्ट्रक्चर ऑडिट करून सुरक्षित वर्गखोल्या उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देऊन जिल्हा प्रशासन आणि जिल्हा परिषद प्रशासनाने तातडीने निधी मंजूर करावा, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

# माजलगावात रसिक मंडळाचा स्वर-सोहळा; दिग्गजांची मैफिल

मराठवाडा स्तरीय सुगम-नाट्यगीत स्पर्धा

माजलगाव -प्रतिनिधी

गेल्या ३९ वर्षांपासून माजलगावचा सांस्कृतिक चेहरा म्हणून ओळख असलेल्या रसिक मंडळाच्या वतीने यंदाही प्रतिष्ठेच्या मराठवाडा स्तरीय सुगम-नाट्यगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाची स्पर्धा १३ सप्टेंबर रोजी होणार असून, त्यापूर्वी १२ सप्टेंबर रोजी उदयोन्मुख आणि दिग्गज कलाकारांच्या सुरेल मैफिलीने या सांस्कृतिक उत्सवाची सुरुवात होणार आहे.

रसिक मंडळाची ही वाटचाल कलावंत, शुभेच्छुक आणि रसिकांच्या राजाश्रयामुळेच यशस्वी झाली आहे. सुरुवातीच्या काळात स्थानिक कलावंतांच्या कला सादरीकरणापासून सुरुवात करून मंडळाने अनेक दिग्गजांच्या मैफिली आयोजित केल्या. गेल्या २२ वर्षांपासून अभिजात संगीताचे जतन आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने मंडळ नाट्यगीत गायन स्पर्धा घेत आहे. गेल्या ११ वर्षांपासून या स्पर्धेला अधिक व्यापक रूप देत तिचे सुगम-नाट्यगीत गायन स्पर्धा असे नामकरण करण्यात आले आहे.

स्पर्धेचे स्वरूप आणि नियम :

ही स्पर्धा केवळ मराठवाड्यातील रहिवाशांसाठी खुली असेल. स्पर्धेसाठी दोन गट असतील - लहान गट १६ वर्षांखालील आणि मोठा गट १६ वर्षांवरील.

प्रत्येक स्पर्धकाला दोन गीते सादर करावी लागतील - एक नाट्यगीत आणि एक सुगम संगीत. दोन्ही गीते एकत्रित ७ मिनिटांत सादर करावी लागतील आणि त्यांचा क्रम मंडळ ठरवेल. स्पर्धेची एकच फेरी असेल.

परगावाहून येणाऱ्या स्पर्धकांची निवासाची व्यवस्था करण्यात येईल. बक्षिसांची रक्कम रोख स्वरूपात दिली जाणार असून, बक्षीस वितरण समारंभाला उपस्थित राहणे स्पर्धकांसाठी बंधनकारक आहे. वाद्य व वादकांची व्यवस्था मंडळातर्फे करण्यात येईल, मात्र स्पर्धकांना स्वतःचे वाद्य व साथीदार आणण्यास मुभा आहे. तानपुऱ्याव्यतिरिक्त इतर कोणतेही इलेक्ट्रॉनिक वाद्य वापरता येणार नाही. स्पर्धेचे प्रवेश शुल्क १५० रुपये ठेवण्यात आले आहे.जास्तीत जास्त स्पर्धकांनी या मराठवाडा स्तरीय स्पर्धेत आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष आर डी भिलेगावकर आणि संपूर्ण रसिक मंडळ यांनी केले आहे.

## खा.बजरंग सोनवणे यांच्या कडून दिवंगत महादेव मुंडे यांच्या पत्नीला न्यायाची ग्वाही

### गोरक्षनाथ टेकडी पायथ्याशी बांधली राखी



केज/प्रतिनिधी

गोरक्षनाथ टेकडीच्या पायथ्याशी एका अत्यंत भावनिक वातावरणात स्वर्गीय महादेव मुंडे यांच्या पत्नीने खासदार बजरंग सोनवणे यांना राखी बांधून भाऊ - बहिणीच्या पवित्र नात्याला उजाळा दिला.रक्षाबंधन आणि या भेटीच्या औचित्याने त्यांनी खासदार बजरंग सोनवणे यांच्या समोर बहिणीच्या नात्याने आपल्या अंतःकरणा तील भावना व्यक्त केल्या.मागील काही काळापासून सुरु असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर,आपल्या पाठीशी एक खंबीर भाऊ म्हणून खासदार उभे राहतील,अशी आशा त्यांनी या वेळी व्यक्त केली.बहिणीची ही भावनिक हाक ऐकून खासदार बजरंग सोनवणे देखील गहिवरले.या प्रसंगी बोलताना खासदार बजरंग सोनवणे यांनी अत्यंत संवेदनशीलतेने आपल्या भावना व्यक्त केल्या.'माझ्या या बहिणीच्या न्यायासाठी मी सदैव तिच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहीन.तिला पूर्ण न्याय मिळवून देण्यासाठी मी वैयक्तिक आणि राजकीय पातळीवर सर्वतोपरी प्रयत्न करेन,असा ठाम विश्वास त्यांनी यावेळी दिला.गोरक्षनाथ टेकडीच्या पायथ्याशी पार पडलेला हा सोहळा केवळ रक्षाबंधनापुरता मर्यादित न राहता, अन्यायाविरुद्धच्या लढ्यात बहिणीला भावाकडून मिळालेल्या भक्कम आधाराचा आणि आश्वासनाचा क्षण ठरला.या प्रसंगी स्थानिक नागरिक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## केज येथे ज्ञानज्योती कोचिंग क्लासेसच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा दिमाखदार गुणगौरव सोहळा संपन्न

डॉ. बी.जे.हिरवे,प्रा.संतोष राऊत यांची प्रमुख उपस्थिती

केज/प्रतिनिधी

केज येथील नामांकित ज्ञानज्योती कोचिंग क्लासेस येथे ऑलिम्पियाड,अक्षर गंगा व स्कॉलरशिप परीक्षांमध्ये घवघवीत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव व कौतुक सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय यशाचा गौरव करत त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला प्रोत्साहन देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या सोहळ्यास प्रा.डॉ. बाबासाहेब हिरवे सर, प्रा.श्री.संतोष राऊत सर व श्री.जगताप सर यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली.प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विविध परीक्षांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शौर्य घोळवे,रुद्राक्ष गिरी, पार्थवी जगताप या अक्षर गंगा,स्कालरशिप मध्ये प्राविण्य मिळविलेल्या व इतर विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्या वरचा आनंद आणि पालकांचा अभिमान यामुळे संपूर्ण कार्यक्रमाला उत्साहाचे वातावरण लाभले.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश हे त्यांच्या मेहनती सोबतच शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांच्या सहकार्याचे फलित असल्याचे सांगितले.स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी सातत्य,शिस्त,मेहनत आणि योग्य मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे आहे, असे त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नमूद केले.कार्यक्रमास अनेक विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या या यशा बद्दल पालकांनीही समाधान व्यक्त करत ज्ञानज्योती कोचिंग क्लासेसच्या शैक्षणिक उपक्रमांचे कौतुक केले.या यशामागे विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण मार्गदर्शन करणाऱ्या संचालिका सौ.प्रीती कलढोणे मॅडम,सौ. पूनम कावळे मॅडम व सौ.नेहा मॅडम यांचे मोलाचे योगदान राहिले.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी ज्ञानज्योती कोचिंग क्लासेसकडून सातत्याने विविध उपक्रम व सराव परीक्षा राबविल्या जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# ऑनलाईन ५१०० रुपये पण शेवटच्या प्रवासाला खांदा नाही!

आज सोशल मीडियावर फिरणारा एक व्हिडिओ अस्वस्थ करून जातो. त्या व्हिडिओमध्ये वृद्धाश्रमात निधन झालेल्या एका वडिलांच्या अंत्यसंस्कारासाठी त्यांची मुलगी ऑनलाइन पैसे पाठवते आणि व्हिडिओ कॉलवरून अंत्यविधी पाहते, असा दावा केला जातो. त्या दाव्याची सत्यता वेगळी बाब असू शकते; पण त्या दृश्याने मनात एक प्रश्न वणवा पेटवतो-आपण खरोखर आधुनिक होत आहोत की माणुसकीपासून दूर जात आहोत?

एक काळ होता, जेव्हा आई-वडील मुलासाठी स्वतःची भूक विसरत होते. अंगावरील फाटके कपडे घालून मुलाच्या अंगावर नवे कपडे चढवत होते. स्वतःच्या स्वप्नांचा गळा घोटून मुलाच्या स्वप्नांना पंख देत होते. मुलाच्या एका अश्रूसाठी रात्रभर जागणारे तेच आई-वडील, आज स्वतःच्या शेवटच्या श्वासासाठी एखाद्या वृद्धाश्रमाच्या चार भिंतींकडे पाहत असतील, तर ही शोकांतिका नाही का?

आज आपल्या मोबाईलमध्ये हजारो फोटो आहेत; पण आई-वडिलांसोबत काढलेला एक निवांत क्षण नाही. सोशल मीडियावर हजारो मित्र आहेत; पण आपल्या जन्मदात्यांशी मन मोकळं करण्यासाठी पाच मिनिटं नाहीत. आपण लाईव्ह येतो, स्टेटस टाकतो, रिल्स बनवतो; पण आपल्या घरात शांतपणे बसलेल्या आई-वडिलांच्या डोळ्यांतील एकटेपणाचं स्टेटस वाचायला आपल्याकडे वेळ नाही.

ही केवळ वेळेची कमतरता नाही; ही संवेदनांची दिवाळखोरी आहे.

आज अनेकांना वाटतं, पैसा दिला म्हणजे कर्तव्य संपलं. पण आई-वडिलांना पैशांपेक्षा मुलाच्या हाताचा स्पर्श हवा असतो. औषधांपेक्षा दोन प्रेमाचे शब्द हवेत. महागड्या भेटवस्तूंपेक्षा आई, बाबा कसे आहात? हा एक साधा प्रश्न हवा असतो.

आपण इतके व्यस्त झालो आहोत की आई-वडिलांच्या वाढत्या सुरकुत्या दिसत नाहीत. त्यांच्या थरथरणाऱ्या हातांतील असहाय्यता दिसत नाही. त्यांच्या डोळ्यांत आपल्या एका भेटीची वाट पाहणारी आशा दिसत नाही. आणि जेव्हा ती नजर कायमची मिटते, तेव्हा लाखो रुपये खर्च करूनही शेवटचा क्षण परत विकत घेता येत नाही.

तरुण मित्रांनो,

तुम्ही मोठे व्हा. अधिकारी व्हा. उद्योगपती व्हा. परदेशात जा. भरपूर पैसा कमवा. पण एक गोष्ट लक्षात ठेवा-यशाची उंची इतकी मोठी कधीच नसते की तिच्या सावलीत आई-वडील हरवून जावेत.

तुमच्या पहिल्या पावलाला बोट देणाऱ्या हाताला शेवटच्या प्रवासात तुमचा खांदा मिळाला नाही, तर तुमच्या सर्व यशावर अपूर्णतेची काळी रेषा कायमची उमटेल.

भारतीय संस्कृतीने आपल्याला मातृदेवो भव, पितृदेवो भव शिकवलं. पण आपण ते आता फक्त भाषणात ठेवतो. संस्कृती फेसबुक पोस्टने जपली जात नाही; ती आई-वडिलांच्या सेवेतून जपली जाते. मंदिरात देव शोधण्यापूर्वी घरातल्या आई-वडिलांच्या चेहऱ्यावरचं हसू जपणं हीच खरी पूजा आहे.

आज वृद्धाश्रम वाढत आहेत. कारण वृद्धांची संख्या वाढली म्हणून नाही; तर मुलांच्या मनातील माया कमी होत चालली म्हणून. हा आकडा कोणत्याही सरकारचा नाही; हा आपल्या समाजाच्या संवेदनाशून्य होत चाललेल्या मनाचा आरसा आहे.

आज एक प्रश्न स्वतःला जरूर विचारा

उद्या माझे आई-वडील नसतील, तेव्हा त्यांच्या आठवणी मला रडवतील का की माझ्या दुर्लक्षाचा अपराध आयुष्यभर जाळत राहील?

कारण...

पैसा वारसा बनू शकतो; पण माया नाही.

मोठं घर बांधता येतं; पण मोठं मन विकत मिळत नाही.

ऑनलाईन व्यवहार करता येतात; पण शेवटचा निरोप कधीच ऑनलाईन देता येत नाही.

आजच आई-वडिलांना मिठी मारा. त्यांच्याशी मनभर बोला. कारण उद्या त्यांच्या फोटोसमोर उभं राहून रडताना तुमचे अश्रू दिसतील पण ते पुसण्यासाठी त्यांचे हात मात्र नसतील.

ज्यांच्या खांद्यावर बसून आपण जग पाहिलं, त्यांच्या शेवटच्या प्रवासाला आपला खांदा नसेल तर आपल्या शिक्षणाचा, संपत्तीचा आणि यशाचा अर्थ तरी काय?



- जालिंदर सुभाषराव भस्करे

प्राथमिक शिक्षक, जि. प. प्राथमिक शाळा बाहेगव्हाण, ता. वडवणी, जि. बीड

## निफाड तालुक्यातील पालखेड मिरची येथे एका एकरातील काकडी शेतीने घडवला यशाचा आदर्श - श्री. विनायक खैरे

नाशिक -: निफाड तालुक्यातील पालखेड येथिल शेतकरी विनायक खैरे यांनी योग्य नियोजन, आधुनिक तंत्रज्ञान आणि सातत्यपूर्ण मेहनत असेल, तर भाजीपाला शेतीतूनही चांगले उत्पन्न मिळू शकते, हे सिद्ध करून दाखवले आहे नाशिक जिल्ह्यातील यजमान शेतकरी श्री. विनायक खैरे यांनी एका एकर क्षेत्रात काकडीची लागवड करून वैज्ञानिक शेती पद्धतींचा अवलंब केला. लागवडीपूर्वी शेताची योग्य मशागत करून दर्जेदार बियाण्यांची निवड करण्यात आली. ठिबक सिंचनाचा वापर, शिफारशीनुसार खत व्यवस्थापन, वेळेवर आंतरमशागत आणि एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन यामुळे पीक जोमदार वाढले.

पिकाची नियमित पाहणी करून आवश्यक त्या उपाययोजना वेळेवर केल्यामुळे




कीड व रोगांचा प्रादुर्भाव कमी राहिला. परिणामी काकडीची फळधारणा भरपूर झाली आणि दर्जेदार उत्पादन मिळाले. बाजारात चांगला भाव मिळाल्याने या पिकातून समाधानकारक आर्थिक उत्पन्नही मिळाले.

ग्रामीण कृषी कार्यानुभव (ठ-थए) कार्यक्रमादरम्यान आम्ही कृषी विद्यार्थ्यांनी श्री. विनायक खैरे यांच्या शेताला नियमित भेटी दिल्या. त्यांच्या शेतीतील नियोजन, मेहनत आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर जवळून अनुभवला. ही यशस्वी शेती इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरावी या उद्देशाने त्यांची यशोगाथा गावातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात आली.

श्री. खैरे यांचा संदेश इतर शेतकऱ्यांसाठी स्पष्ट आहे - शिफारशीनुसार शेती करा, पिकाची नियमित काळजी घ्या आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करा. योग्य व्यवस्थापन केल्यास एका एकरातूनही चांगले उत्पादन आणि अधिक नफा मिळवता येतो.

आज श्री. विनायक खैरे यांची काकडी शेती परिसरातील अनेक शेतकऱ्यांसाठी प्रेरणास्थान बनली असून, त्यांच्या यशोगाथेमुळे इतर शेतकरीही वैज्ञानिक पद्धतीने भाजीपाला लागवड करण्यास प्रोत्साहित होत आहेत.

## मुंबई येथील १ सप्टेंबरच्या एल्गार महामोर्चात ओबीसी समाजाने सहभागी व्हावे-नामदेवराव आयलवाड

भोकर/प्रतिनिधी

ओबीसी विरोधी महाराष्ट्र शासन यांच्याकडून ओबीसींची डीएनए तपासणी करण्याच्या प्रयत्नाविरोधात, ओबीसी महारक्षक प्रा. लक्ष्मण हाके यांच्या नेतृत्वाखाली लाखो ओबीसी बांधवांचा महाराष्ट्र राज्य मंत्रालयावर ओबीसी एल्गार महामोर्चात १ सप्टेंबर २०२६ रोजी ओबीसी समाजाने हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ओबीसी नेते नामदेवराव आयलवाड यांनी केले आहे.




१. हैद्राबाद गॅझेट रद्द करा. २. ओबीसी विरोधी हैद्राबाद गॅझेटद्वारे २२ लाख २० हजार ५७७ दिलेले मराठा कुणबी जात प्रमाणपत्र आणि जातवैधता प्रमाणपत्र त्वरित रद्द करा! ३. ओबीसी विरोधी न्यायमूर्ती संदीप शिंदे समिती रद्द करा! ४. ओबीसी विद्यार्थ्यांच्या शाळा-कॉलेजमधील २७% शैक्षणिक आरक्षण कायम ठेवून महागाई निर्देशांकानुसार शिष्यवृत्ती देऊन प्रत्येक तालुकास्तरावर सर्व सुविधायुक्त वसतिगृह चालू करा! ५. ओबीसी सुशिक्षित बेरोजगार युवकांची २७% आरक्षणाप्रमाणे शासकीय-निमशासकीय नोकर भरती चालू करा! ६. ओबीसींना जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका, पंचायत समिती, ग्रामपंचायत, मार्केट कमिटी, सहकार व सर्व स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये २७% राजकीय आरक्षणाची अंमलबजावणी करा! ७. ओबीसी-एससी-एसटी समाजाची जातनिहाय जनगणना करून ओबीसी प्रवर्गाची लोकसंख्या जाहीर करा! ८. मंडल आयोगाची सरकारी आणि खाजगी क्षेत्रात प्रभावी अंमलबजावणी करा! प्रत्येक तालुकास्तरावर सर्व सुविधायुक्त वसतीगृह चालू करा!

तरी तळागाळातील ओबीसी समाजाने मुंबई येथे होणार्या १ सप्टेंबरच्या ओबीसी एल्गार महामोर्चात हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ओबीसी नेते नामदेवराव आयलवाड यांनी केले आहे. यावेळी ओबीसी नेते विजयकुमार देवडे, इंजि लक्ष्मणराव लिंगापुरे, दत्ताजी मोहिते, संदीप जिल्लेवाड, सतीश देशमुख, मनोज यादव, राजू यादव, बी.के. पाटील कोटेकलूरकर आदी ओबीसी पदाधिकारी, कार्यकर्ते, समाजबांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

## गुटखा-मावा विक्रीवर एलसीबीची मोठी कारवाई बेलवंडी व सोनईत ५ ठिकाणी छापे, ८ जणांवर गुन्हे

श्रीगोंदा/प्रतिनिधी

जिल्ह्यातील अवैध गुटखा व सुगंधित तंबाखू विक्रीविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेने २७ ऑगस्ट रोजी मोठी मोहीम राबवली. पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखालील दोन विशेष पथकांनी बेलवंडी व सोनई पोलीस ठाण्याच्या हद्दीत ५ वेगवेगळ्या ठिकाणी धडक छापे टाकले. या कारवाईत पोलिसांनी ८९,३६६ रुपये किमतीचा पानमसाला (गुटखा), मावा व सुगंधित तंबाखूचा साठा जप्त केला असून, ८ आरोपींवर ५ गुन्हे दाखल केले आहेत. सोनईत आरोपी शब्बीर महताब सय्यद व जावेद उस्मान शेख (माल जप्त रु. २०,२४८) यांच्यावर गुन्हे नोंदवण्यात आले. तर बेलवंडी हद्दीत सोमनाथ उर्फ गणेश घोरपडे (माल जप्त रु. ५,०३८), विजय सतीष चोरडिया (माल जप्त रु. १६,४००) आणि जाकीर इसाक शेख (माल जप्त रु. ३४,४२०) यांना पकडण्यात आले. या गुन्ह्यांमध्ये प्रतिबंधित माल पुरवणारे मुख्य सूत्रधार संकेत अशोक पाचपुते (रा. काष्टी), कमलेश मुरली कृपालीनी (रा. दौंड) आणि फयाज तांबोळी (रा. अहिल्यानगर) हे तिघे फरार झाले असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार निळकंठ कारखेले, अतुल लोटके, विकास साळवे, सतीष भवर, गणेश लोंढे, रोहित येमुल, बाळासाहेब गुंजाळ, रणजीत जाधव, शामसुंदर जाधव, प्रताप देवकाते, मनोज साखरे, अमोल आजबे, प्रकाश मांडगे व अमोल कोतकर यांनी ही कारवाई केली आहे.



## कलमनुरीत ईद मिलादुन्नबी निमित्त सामूहिक विवाह सोहळा; १५ जोडपी विवाहबद्ध



कलमनुरी : ईद मिलादुन्नबी निमित्ताने कलमनुरी शहरात नूरी हेल्प ग्रुपच्या वतीने सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. बुधवार २७ ॲगसट रोजी रुशदा फंक्शन हॉल येथे झालेल्या या सोहळ्यात १५ जोडप्यांचा निकाह पार पडला. हा सामूहिक विवाह सोहळा व शहरातील मुस्लिम धर्म गुरु यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.नूरी हेल्प ग्रुपच्या वतीने गेल्या सलग १० वर्षांपासून ईद मिलादुन्नबी च्या निमित्ताने सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले जात आहे. विवाह सोपा करणे तसेच विवाह सोहळ्यांमध्ये होणारा अनावश्यक खर्च टाळणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.या सामूहिक विवाह सोहळ्यात विवाहबद्ध झालेल्या जोडप्यांना पलंग, कपाट यासह विविध आवश्यक घरगुती वस्तू भेट म्हणून देण्यात आल्या. तसेच वधू-वर दोन्ही पक्षांच्या पाहुण्यांसाठी भोजनाची व्यवस्था आयोजकांकडून करण्यात आली.विवाह सोहळ्यात अकदची प्रक्रिया चांद मियाँ साहेब यांनी पूर्ण केली, तर मौलाना शाकेर रजा यांनी खुतबा-ए-निकाह पठण केले. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. उपस्थितांनी नवविवाहित जोडप्यांना विवाहाच्या शुभेच्छा देत त्यांच्या सुखी वैवाहिक जीवनासाठी दुआ केली.हा सामूहिक विवाह सोहळा यशस्वी करण्यासाठी नूरी हेल्प ग्रुपचे हाजी अब्दुल्ला अशरफी, हाजी अब्दुल गनी बागवान, अजीज खान, ॲड. इलियास नाईक, मुस्तफा बेग, मतीन शेख यांच्यासह इतर सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.